# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्रं. - १२** **// महासभा बैठकीचे कार्यवृत्त //** **दि.०३/०८/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ०३/०८/२०१९ गुरूवार रोजी सकाळी .११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर . सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सिमा सुरेश भोळे , महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| सोनवणे अश्विन शांताराम | चौधरी मनोज सुरेश | ढेकळे सदाशिव गणपत |
| **जोहरे प्रिया मधुकर** | भोईटे लताबाई रणजीत | पाटील राजेंद्र झिपरु |
| नेरकर सरिता अनंत | **पाटील प्रतिभा सुधिर** | महाजन सुनिल सुपडू |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | शेख शबानाबी सादीक |
| सोनवणे कांचन विकास | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | देशमुख प्रतिभा गजानन | बालाणी भगतराम रावलमल |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील विजय पुडलिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| बाविस्कर किशोर रमेश | बारी शोभा दिनकर | काळे रेश्मा कुंदन |
| सपकाळे मिना धुडकु | शेख हसीनाबी शरीफ | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | पाटील कुलभुषण विरभान | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | भिल पार्वताबाई दामु | खडके सुनिल वामनराव |
| सनकत चेतन गणेश | पाटील उषा संतोष | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| **चौधरी चेतना किशोर** | कोल्हे सिंधु विजय | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | शेख सैईदा युसुफ |
| **भंगाळे विष्णू रामदास** | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| **सोनवणे राखी शामकांत** | बेंडाळे उज्वला मोहन | **सोनवणे लताबाई चंद्रकांत** |
| **तायडे ज्योती शरद** | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| लढढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | कैलास नारायण सोनवणे |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | विशाल राधेश्याम त्रिपाठी |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | राजेंद्र नारायण मराठे |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | मराठे जितेंद्र भगवान | महेश रतन चौधरी |
| सोनवणे धिरज मुरलीधर | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भागचंद मोतीलाल जैन |
| **काळे दिपमाला मनोज** | पाटील रेखा चुडामण | |
| **पाटील सचिन भिमराव** | सोनवणे सुरेखा सुदाम | |

सदर सभेस मा. आयुक्त , डॉ.उदय टेकाळे , मा.उपायुक्त.श्री.मिनानाथ दंडवते , मा.उपायुक्त.श्री.उत्कर्ष गुटे , मा.उपायुक्त.श्री. अजित मुठे, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.रंजना विजय वानखेडे (सोनार) , श्री.विश्वनाथ सुरेश खडके, ॲड दिलीप बबनराव पोकळे यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते . मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १६८ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.सिमा सुरेश भोळे, मा.महापौर | शहरातील उदयोजक स्व.अनिल बोरोले, शहरातील बेंडाळे नगर मधील रहिवाशी स्व.शशिकला यशवंत महाजन, शहरातील स्व.शांताराम महाजन, शहरातील स्व.बेबाताई दत्तु महाजन, शहरातील स्व.मनोज शिवदास सुरसे यांचे दुखद निधनाबद्दल. |
| २. | श्री.ललित विजयराव कोल्हे | मनपा कर्मचारी श्री.दिलीप जानकीराम पाटील यांच्या आई स्व.कोकीळाबाई जानकीराम पाटील, शहरातील भुषण कॉलनीतील रहिवाशी कै.डॉ.भागवत नामदेव नारखेडे, शाहू नगर येथिल स्व.शौकत निसार भिस्ती, पोस्टल कॉलनीतील रहिवाशी स्व.अनिल श्रीधर बोरोले यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | श्री.विष्णू रामदास भंगाळे | फॉरेस्ट कॉलनी,रिंग रोड येथिल श्री.योगेश पाटील यांचे वडील स्व.गोपाळ रामदास पाटील, बळीराम पेठेतील रहिवाशी तथा शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख स्व.गणेश राणा, दाणाबाजार येथिल श्री.विपूल सुरतवाला यांचे वडील स्व.जगमोहन सुरतवाला, पोस्टल कॉलनीतील रहिवाशी स्व.अनिल श्रीधर बोरोले यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | श्री.राजेंद्र झिपरु पाटील | रामेश्वर कॉलनीतील स्व.योगेश जंगले यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | श्री.राजेंद्र नारायण मराठे | माजी सैनिक परमवीर चक्र प्रदान अब्दुल हमीद यांच्या पत्नी स्व.रसुल बी बी, तसेच भाजपा मंडल अध्यक्ष श्री.शक्ती महाजन यांच्या मातोश्री स्व.बेबाबाई दत्तू महाजन यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | श्री.सचिन भिमराव पाटील | प्रभाग क्रं.७ मधील रहिवाशी कै.कृष्णराव सखाराम पाटील, कै.दंगल माधव पाटील, कै.नगाबाई रामा गोपाळ यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ७. | श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | भाजपा मंडल अध्यक्ष श्री.शक्ती महाजन यांच्या मातोश्री स्व.बेबाबाई दत्तू महाजन यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ८. | सौ.उज्वला मोहन बेंडाळे | प्रसिध्द उदयोजक,कै.अनिलदादा बोरोले, कै.भाईसाहेब दिलीपराव निकम, कै.आशालता वसंत जावळे, कै.अबायामाई सुर्वे, कै.वत्सलाबाई येवले, कै.प्रा.शा.ना.पाटीलसर यांचे दु:खद निधनाबाबद्दल. |
| ९. | सौ.मंगला संजय चौधरी | कै.विमलबाई भिला ठाकूर, कै.सोनाबाई पोपट चौधरी, कै.कैलास नागो पाटील, कै.मोतीलाल छगन चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १६९ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | श्री.ललित विजयराव कोल्हे | दिनांक ०२/०८/२०१९ रोजीच्या वृत्तपत्रिय बातमीनुसार नुकताच अनेकवेळा स्थगित असलेला जुनाट व मध्ययुगीन कुप्रथा तिहेरी तलाक बंदी कायदा संमत करुन मुस्लिम महिलांना न्याय देण्याचा ऐतिहासिक कायदा संमत |

| | | |
|---|---|---|
| | | केल्याबद्दल मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी, पंतप्रधान, भारत सरकार व इतर सांसद मान्यवरांचे हार्दीक अभिनंदन तसेच दि.२३/०७/२०१९ रोजी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने चांद्रयान २ चे यशस्वी प्रक्षेपण केलेले आहे त्यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) यांनी केलेल्या कार्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | 'आरत' या सावता महाराजांच्या पुण्यभुमीत सन्मा.सदस्या श्रीमती सरिताताई नेरकर यांना 'समाज भुषण' सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच 'ट्रीपल तलाक' विधेयक लोकसभा व राज्यसभेत मंजूर केल्याबद्दल सर्व सन्मा.खासदार व मा.प्रधानमंत्री श्री.नरेंद्रजी मोंदी यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ३ | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | प्रभाग क्रं.२ शिवाजी नगर मध्ये स्मशानभुमी रेल्वे लाईनच्या भिंतीला लागुन ते बारसे कॉलनी ओपनस्पेस, धचनाजी काळे नगर ओपनस्पेस या ठिकाणी १) गुरुमाऊली महिला बचत गट शिवाजी नगर,जळगांव, २) श्री.गणेश शैक्षणिक व सांस्कृतिक क्रिडा संस्था,जळगांव, ३) श्री.दत्तगुरु शैक्षणिक व सामाजिक सेवा मित्र मंडळ,जळगांव, ४) जळगांव जनता सहकारी को.ऑप.बँक लि.जळगांव व ५) बळवंत नागरी सहकारी संस्था शिवाजी नगर,जळगांव यांनी २०० झाडे लावुन जागविलेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४ | श्री.विशाल राधेश्याम त्रिपाठी | जळगांव शहरातील नागरीक श्री.राष्ट्रपाल सुरळकर यांनी शहरात विविध ठिकाणी सुमारे १५० वृक्ष लावुन ते जगवली असुन त्यांनी केलेल्या कार्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | श्री.राजेंद्र झिपरु पाटील<br>सौ.गायत्री इंद्रजित राणे | आरणगांव या सावता महाराजांच्या पुण्यभुमीत सन्मा.सदस्या श्रीमती सरिताताई नेरकर यांना 'समाज भुषण' सावित्रीबाई फुले पुरस्कार मिळाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ६ | श्री.राजेंद्र नारायण मराठे | मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, जलसंपदा व वैदयकीय मंत्री हे जळगांव जिल्हयाचे पालकमंत्री झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ७ | श्री.विष्णू रामदास भंगाळे | जळगांव शहर परिसरातील कुंभारखोरी याठिकाणी रोटरी क्लब जळगाव व महानगरपालिकेचे महापौर मा.सौ.सिमा सुरेश भोळे, उपमहापौर,मा.श्री.अश्विनभाऊ शांताराम सोनवणे तथा म.आयुक्त श्री.उदय टेकाळे व महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या वृक्षरोपणाचे कार्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ८ | श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा | दि.१ ऑगष्ट २०१९ चे आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने जळगांव शहर महानगरपालिकेस रक्कम रुपये ४१ कोटींचा निधी प्राप्त करुन दिल्याबद्दल मा.ना.श्री.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे तसेच याकामी सतत पाठपुरावा करणारे मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन,पालकमंत्री जळगांव जिल्हा तसेच मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे यांचे हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ९ | सौ.मंगला संजय चौधरी | अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पिठाधीश व आपल्या सर्वांच्या हृदयात गुरुत्वाची ज्योत सतत तेवत ठेवणारे श्री.स्वामी समर्थ परमपूज्य गुरुमाऊलींच्या बालसंस्कार उपक्रमाची दखल घेत इंटरनॅशनल इंन्स्टीटयुट ऑफ एज्युकेशन अण्ड मॅनेजमेंट या आंतरराष्ट्रीय संस्थेने प.पु.गुरुमाऊलींना “भारत सेवारत्न” हा पुरस्कार जाहीर झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगर मध्ये रेल्वे लाईनच्या लागून असलेल्या भिंत ते ममुराबाद स्मशानभुमि पर्यंत व बारसे कॉलनी ओपनस्पेस मध्ये तसेच हिंदु स्मशानभुमि मध्ये गणेश क्रीडा संस्था व गुरूदत्त सेवा मित्र मंडळ तसेच गुरू माऊली महिला बचत गट , शिवाजी नगर यांनी एकूण झाडे २०० लावली असुन वरील केलेले वृक्षारोपन संदर्भात व वृक्षारोपन देखभाल संदर्भात संपुर्ण जबाबदारी घेतली असुन त्याकरीता आपण महानगरपालिकेने दिलेले वृक्ष त्यांनी लावुन घेतले असुन त्याकरीता त्यांचा दि.०३/०८/२०१९ रोजी महासभा सुरू होण्यापुर्वी वरील संस्था व बचत गटाचे सत्कार करण्यात यावा ही नगरसेवक या नात्याने आपल्याकडे विनंती करीत आहे. सदर प्रभागातील नागरीक येथे आलेले आहेत.

येणेप्रमाणे विनंती नुसार मा.महापौर सो यांनी गणेश क्रीडा संस्था व गुरूदत्त सेवा मित्र मंडळ तसेच गुरू माऊली महिला बचत गट , शिवाजी नगर येथील नागरीकांचा सभेत सत्कार करण्यात आला.

श्री.विशाल त्रिपाठी :- माझे परिचयातील श्री.राष्ट्रपाल सुरळकर म्हणून एक व्यक्ती आहेत त्यांनीही काही वृक्ष लावलेले असुन त्यांचाही सत्कार पुढील महासभेत करण्यात यावा. कारण त्यांनी १५० झाडे स्वत: लावुन जगविलेले आहेत तरी त्याबद्यल त्यांचा पुढील वेळी सत्कार करण्यात यावा.

**नगरसचिव :-** जळगांव शहर महापालिकेसाठी शासनातर्फे ३ उपायुक्त नियुक्त करण्यात आलेले असुन ते आज सभेत उपस्थित आहेत , त्यांचा सभागृहास परिचय होणे आवश्यक आहे तरी मा.उपायुक्त यांनी सभेत आपला परिचय करून द्यावा.

**१) श्री.**अजित मुठे यांनी सभेस परिचय करून दिला.

**२) श्री.**उत्कर्ष गुटे यांनी सभेस परिचय करून दिला.

**३) श्री.**मिनानाथ दंडवते यांनी सभेस परिचय करून दिला

**नगरसचिव :-** प्रजा फाऊडेंशन , मुंबई द्वारा दिनांक.०९ व १० ऑगष्ट २०१९ रोजी सन्मा .सदस्यांकरीता कार्यशाळा ओयाजित करण्यात आलेली आहे ही कार्यशाळा दोन सत्रात आहे सदर कार्यशाळा प्रथम सत्र सकाळी १०.०० ते ०१.०० वाजेपासुन नगरसेवक (पुरुष) यांचेकरीता आहे तदनंतर दिनांक.०९ व १० ऑगष्ट २०१९ रोजी दुपारी ०२.०० ते ०५.०० वाजेपावेतो नगरसेविका (महिला) यांचेसाठी स्वतंत्र कार्यशाळा आहे अशा दोन सत्रात ओयाजन करण्यात आलेले असुन मा.महापौर महोदया यांचेकडुन विनंती आहे की सन्मा.सदस्यांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी सभेपुढे एक अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो तो असा की , २०१९ रोजी निघालेला शासन निर्णय जळगांव शहर महानगरपालिकेला ७० कोटी रूपयांच्या निधीपैकी साधारणत: ४१ कोटी ९५ लक्ष रू निधी प्राप्त झाल्याचा शासन निर्णय निघाला आहे त्या शासन निर्णयाच्या अनुषगांने मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन , महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री महोदय देवेंद्रजी फडणवीस साहेब , या शहराचे सन्मा.आ.श्री. राजुमामा भोळे यांचे मनापासुन अभिनंदन करण्यात येत आहे. वृत्तपत्रातुन ज्या बातम्या वाचल्या की १०० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे परंतु खऱ्या अर्थाने ७० कोटी पैकी ४१ कोटी ९५ लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झालेला आहे निश्चितपणे या शहरासाठी ही अत्यंत सन्मांनाची बाब आहे परंतु मागील काही महिन्यापुर्वी चर्चा वृत्तपत्रातुन आपण ऐकत होतो की महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करता ३० टक्के रक्कम जी आहे ती सुध्दा राज्य शासन देणार आहे या

संदर्भाची भुमिका आपल्याला ऐकून होती परंतु शासन निर्णय बघितल्यानंतर राज्य शासनाकडुन अनुज्ञेय अनुदान ७० टक्के २९ कोटी ५० लक्ष नागरी संस्थेचा सहभाग म्हणजे १२ कोटी ८५ लक्ष रूपये ही मनपाला भरणे अपेक्षित आहे मा.महापौर ताई खऱ्या अर्थाने चिंतेची बाब ही आयुक्तांची आहे की १२ कोटी ८५ लक्ष रूपये ची उभारणी करणे संदर्भात एका अर्थाने बघितले तर आपले प्रशासन तसे सक्षम झालेले आहे तीन उपायुक्त आपले काम करण्यासंदर्भातील आहे मनपाची आर्थिक बाबजी आहे ती सर्वश्रुत आहे १२ कोटी ८५ लक्ष रूपये ची उभारणी करणेसुध्दा क्रमप्राप्त आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ फक्त अभिनंदन करा .

**श्री.नितीन लढ्ढा :-** अभिनंदन केले परंतु या अनुषगांने मी महापौर ताईंना मी या अभिनंदनाच्या प्रस्तावाच्या माध्यमातुन मा.गिरीषभाऊ महाजन यांना विनंती करुया की ही ३० टक्के रक्कम १२ कोटी ८५ लक्ष रूपये.

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ मी तुमच्या माहिती साठी सांगतो १०० कोटी रू त्यांनी मंजुर केलेले आहे तुम्ही सांगत आहात ते बरोबर आहे की ७० कोटी मिळेल व बाकी रक्कम आपल्याला भरावे लागतात तुम्ही जे आता म्हणत आहेत की आपली परिस्थिती बाबत त्या संदर्भात ज्यावेळी मुख्यमंत्री नियोजन हॉल येथे आले होते त्यावेळी त्यांनी होकार दिलेला होता आपल्याला फक्त त्यासाठी प्रयत्न करावे लागतील .

**श्री.नितीन लढढा :-** तुम्ही म्हणत आहात तर आम्ही विश्वास करू त्या गोष्टीवर परंतु आज मुळात शासन निर्णय आपल्या हातात आहे आणि ३० टक्के रक्कम भरायची जबाबदारी ही स्थानिक संस्थेवर सोपविलेली आहे आपण पुनश्च याच प्रमाणे मा.ना.श्री.गिरीषभाऊंना व मा.आमदार यांना विनंती करूया की ३० टक्के रक्कम सुध्दा आपल्याला मिळावी.

**श्री.भगतराम बालाणी :-** जे १०० कोटी रू आणायची क्षमता मा.श्री.गिरीषभाऊ ठेवता तसे १२ कोटी रू . कसे उभे करू यांचे संपुर्ण नियोजन झालेले आहे तरी जो १०० कोटी रू आणु शकतो तो १२ कोटी रू सुध्दा आणु शकतो .

**श्री.नितीन लढढा :-** ठिक आहे त्यामुळे कामांना चालना मिळाली .मा.महापौर साहेब एक दुदैवी बाब आहे या शासन निर्णयामध्ये की या शासन निर्णयाच्या अनुषगांने सदर अनुदानातील कामे ही बांधकाम विभागामार्फत करण्यात यावी एकगोष्ट मला सभागृहाच्या निदर्शनास आणुन द्यायची आहे की या महानगरपालिकेचा ३० टक्के निधीचा हिस्सा आला स्वत:चा आहे आणि स्वत:चा निधी असतांना राज्य शासनाने ७० टक्के निधी दिलेला आहे तो मान्य आहे परंतु ३० टक्के निधी हा स्वत:चा असल्यानंतर कार्यान्वित यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन राबविण्यात यावी हा मात्र कुठेतरी चुकीचा घाट आहे याच्या मागची पार्श्वभुमी सांगतो की हा पायंडा केव्हापासुन पडलेला आहे की ज्यावेळेला एखादी महानगरपालिका येथे आमदार दुसऱ्या पक्षाचा असेल आणि स्थानिक स्वराज्य संस्था ही वेगळया पक्षाकडे असते त्यावेळेला या कृतीचा अवलंब होतो परंतु हा शासन निर्णय करतांना कदाचित शासनाला हा विसर पडलेला दिसतोय की जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये सत्ता भारतीय जनता पक्षाची आहे असा विसर पडलेला दिसुन येतो परंतु माझी पुनश्च विनंती आहे की महानगरपालिकेचा निधी आणि कार्यान्वीत यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी , सन्मा.सदस्य व सन्मा.अधिकारी यांचे कुठलेच नियंत्रण या कामावर राहणार नाही कारण काय आहे की ज्यावेळेला कार्यान्वीत यंत्रणाच राज्य शासनाच्यास अखत्यारीत असेल जर कधी ही यंत्रणा महानगरपालिकेच्या अनुषगांने राबविली गेली असती तर या महानगरपालिकेचा कुठलाही सदस्य त्याठिकाणी जाऊन जाब विचारू शकला असता किंवा ज्या कामावर ज्याची नियंत्रणाची जबाबदारी असेल तो अधिकारी जाब विचारू शकला असता क्वालीटीच्या संदर्भातील जाब विचारू शकला असता , प्रत्येक गोष्टीचा जाब विचारला गेला असता आणि महानगरपालिकेची यंत्रणा याच दबावाखाली राहीली असती की महानगरपालिकेचे पदाधिकारी, सन्मा.सदस्य हे या कामावर नियंत्रण ठेवत असल्याकारणाने या कामामध्ये क्वालीटीमध्ये कॉम्परमाईज झाली नसती, परंतु या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यान्वीत यंत्रणा ही सार्व. बांधकाम विभागाची असल्याने या कामावर कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, सन्मा.सदस्यांचे नियंत्रण राहणार नाही म्हणनु पुनश्च आपली विनंती आहे की राज्य शासनाने

कुठेतरी दुरूस्ती करून ही यंत्रणा जळगांव शहर महानगरपालिका यांच्या माध्यमातुनच राबविण्यात यावी ही विनंती करण्यात यावी.

**श्री.भगतराम बालाणी :-** महानगरपालिकेने शासनाला विनंती अर्ज केलेला नव्हता की आम्हाला निधी द्यावा , शहराचा विकास व्हावा म्हणून हा निधी विकास कामासाठी आलेला आहे आणि हे काम A , B किंवा ब कडुन करावे हा शासनाचा विषय आहे त्याच्या मध्ये काही विनंती करायची गरज नाही .

**श्री.प्रशांत नाईक :-** शासन तुला महापालिकेवर भरोसा नाही का ? शासन तुला महापौरांवर भरोसा नाही का ? शासन तुला अधिकाऱ्यांवर भरोसा नाही का ? शासन तुला नगरसेवकांवर भरोसा नाही का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** मंत्री महोदय श्री.गिरीषभाऊ त्याठिकाणी पाठपुरावा करीत आहेत आणि शासन काही आम्ही एकटयांचे नाही तुम्ही व आम्ही मिळुनच शासन आहे आणि हा विषय या ठिकाणी संपलेला आहे . आणि मी महापौर साहेबांना विनंती करेल की काही विषय आहेत की त्यांची चर्चा एकच आहे आणि तुम्हाला कोणकोणत्या विषयांवर चर्चा करायची आहे कारण आम्ही ठरवलेले आहे की कोणता विषय मान्य केला आहे , किंवा कोणता विषय अमान्य केला आहे किंवा कोणता टिडीआर चा केला आहे. आणि कोणत्या विषयामध्ये दुरूस्तीचे सुचविलेले आहे त्याची यादी आम्ही देणार आहोत पहिला विषय झाल्यानंतर तुम्हाला कोणत्या विषयावर बोलायचे आहे तो आटोपला की आपण चर्चा करू.

**सौ.मंगला संजय चौधरी :-** मी महापौरांना विनंती करते की , अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरूपीठाचे पीठधीश व आपल्या सर्वांच्या ह्रदयात गुरूत्वाची ज्योत सतत तेवत ठेवाणारे श्री.स्वामी समर्थ परमपुज्य गुरूमाऊंलीच्या बालसंस्कार उपक्रमाची दखल घेत इंटरनॅशनल इंन्स्टीटयुट ऑफ एज्युकेशन अॅन्ड मॅनेजमेंट या आंतरराष्ट्रीय संस्थेने प.पु. गुरूमाऊंलींना भारत सेवारत्न हा पुरस्कार जाहीर केलेला आहे . तरी महासभेत त्यांचा अभिनंदनाचा ठराव करावा तसेच प.पु.गुरूमाऊलींना दि.३० ऑगष्ट २०१९ रोजी दिल्ली येथे होणाऱ्या समारंभात हा सन्मान आदरपुर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

**श्री.विष्णू भंगाळे :-** मागे रोटरी परिवाराच्या माध्यमाने एक टेकडी वृक्षारोपनासाठी घेतली होती त्यामध्ये रोटरी परिवार, महानगरपालिका , आयुक्त साहेब , मा.महापौर , मा.उपमहापौर यांनी जो सहभाग नोंदविला आणि यांच्या माध्यमातुन जे वृक्षारोपन झालेले आहे ही एक खुप चांगली गोष्ट झालेली आहे आणि त्या निमीत्ताने मी महानगरपालिका आणि जे काही सभासद जे सहभागी झालेत त्यांचा मी रोटरी परिवाराच्या तर्फे अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवतो .

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** दि.०६/०६/२०१९ रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** विनंती की दि.२१/१२/२०१८ रोजी झालेल्या महासभेमध्ये ठराव क्रं. १०५ विषय क्रं. २८ मध्ये दुरूस्ती करणे बाबत आहे. नाविण्य पुर्ण योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीमार्फत मंजुर झालेल्या मुलींसाठी अभ्यासिका बांधणे कामी श्रध्दा कॉलनी सर्वे नं.४७१/अ१/२अ असे चुकीने ठराव झालेला आहे. तरी सदरील स.नं.४७१/अ१/२क /१+४७१/अ२/ २ब मेहरूण असुन सर्वे नंबर दुरूस्ती चा प्रस्ताव महासभेपुढे घेवुन सदरच्या ठरावात बदल करून घेण्यात यावा अशी विनंती .

**अॅड . शुचिता हाडा :-** एक नविन विचार आलेला आहे डोक्यात की सभेचे कामकाज जे होते म्हणजे ईतिवृत्त मंजुर झाल्यानंतर यापुढे मान्य करण्यात येणारे कार्यवृत्त महानगरपालिकेच्या वेबसाईट वर अपलोड केले तर सामान्य जळगांव शहरातील नागरीकांना महासभेत कामकाज काय सुरू आहे त्यांनी निवडुन दिलेले लोकप्रतिनिधी सभेपुढे कसे मुद्ये मांडतात , किंवा कोणत्या समस्या मांडतात , शहरातील कोणत्या समस्या मांडतात यामुळे पारदर्शी पणा सुध्दा वाढेल तर मनपाच्या वेबसाईटवर इतिवृत्त कायम झाल्यावर अपलोड करावे

तसेच मी मागील महासभेत जी लक्षवेधी मांडली होती याच्याबद्यल मला प्रशासनाकडुन किंवा आयुक्त साहेबांकडुन उत्तर हवे आहे की प्रशासनाने त्यावर काय कार्यवाही केली आत्ताचे प्रेझेंट स्टेटस एलईडी बद्यलचे काय आहे ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** मागील महासभेमध्ये मांडलेल्या लक्षवेधी च्या अनुषगांने आपण सदर कंपनीस आपण सविस्तर अहवाल देणेबाबत तसेच त्यानुसार कायदेशीर तज्ञांचे मत घेवुन एक महिन्याची मुदत ची नोटीस देण्यात आलेली

असुन त्यांना मुदत देण्यात आलेली आहे. तरी सदर कालावधी पुर्ण झाल्यानंतरच आपण पुढील कार्यवाही करू शकतो . तसेच त्यावर कंपनीचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर आपण पुढील कार्यवाही करू.

**ॲड . शुचिता हाडा :-** १७ ऑगष्ट २०१९ पावेतो ची मुदत दिलेली आहे.

**श्री.सुशिल साळुंखे :-** होय

**ॲड . शुचिता हाडा :-** याचा पाठपुरावा प्रशासनाने करावा कारण तो महत्वाचा विषय आहे . त्यामुळे खुप कामे पेडींग पडलेली आहेत.

**श्री.सुशिल साळुंखे :-** पाठपुरावा करण्यात येईल .

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ तुम्हाला यापैकी कोणत्या विषयांवर चर्चा करायची आहे. आमचे असे ठरलेले आहे की कोणता विषय मंजुर करायचा किंवा कोणता विषय तहकुब ठेवायचा आहे किंवा काय

**श्री.विष्णु भंगाळे :-** दोन नंबरचा विषयाबाबत काय झाले आहे

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणता विषय आहे आम्ही मंजुर केलेला आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** अप्पा विषय क्रं. २ बाबत मला बोलायचे आहे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.०६/०६/२०१९ रोजी झालेल्या महासभेचे कार्यवृत्त कायम करणेंस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** विकास योजना जळगांव (वाढीव हद्द) निमखेडी शिवारातील गट नं.६६, जळगांव शिवारातील स.नं.३०७, ३११, ३१२, ३१८, , ३१९, ३२३, ३२५, ३२६, ३२७, ३२८, ३५३, ४१६, ४१९, ४२०, ४२१, ४२२, ४२३, ४२९, ४३१, ४३२, ४२९, ४३४, ४५७, ४५८, ४६३, ४६४, ४६८, ४६९, ४७२, ४७६, ४७७, ४८२ मधुन दर्शविलेली वाघुर कॅनॉलची आखणी रद्द करणेसाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**ॲड . शुचिता हाडा :-** मी सभागृहापुढे काही मांडु ईच्छिते , आपण कलम ३७ अन्वये जी कार्यवाही करतो आहे जर आपण ही कलम ५० प्रमाणे जर केली असती तर ती जास्त उचित व वेळेची बचत करणारी असती , संबंधित अधिकारी यांनी याबाबत सांगावे .

**श्री.अनंत धामणे :-** आपण वेळोवेळी हा विषय करतो आहे , महानगरपालिका आहे म्हणुन असे नाही कारण हायकोर्टामध्ये तीन मॅटर झालेले आहेत आणि त्यांनी आपल्याला प्रत्येक वेळी सांगीतलेले आहे की तुम्ही असे का करत नाहीत आणि शासनाचे आपल्याला पत्र आलेले आहे की तुम्ही कार्यवाही करावी.म्हणुन तो प्रस्ताव आपण तयार केलेला आहे.

**ॲड . शुचिता हाडा** :- म्हणजे तुमचे म्हणणे आहे की आपण करू शकत नाही पण माझे म्हणणे आहे की मनपासुध्दा ते करू शकते .आणि ५० प्रमाणे जर केली तर ती वेळेची बचत करणारी ठरेल

**श्री.अनंत धामणे :-** आपण फक्त काही प्रकरणांमध्ये ५० ची कार्यवाही करू शकतो त्या प्लॅनिंग ॲथॉरीटी वेगळया आहेत.

**ॲड . शुचिता हाडा** :- ३७ प्रमाणे वेळ जास्त लागणार आहे . आपण त्यांना नोटीस देणार मग निर्णय घेणार यामुळे फार वेळ लागतो म्हणजे खुप वेळखाऊ पणा आहे

**श्री.अनंत धामणे :-** आपले पॅनलवर जे लोक आहेत ते आपल्याला मार्गदर्शन करतात म्हणुन मग आपण ३७ प्रमाणे कार्यवाही करतो .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव शहराची वाढीव हद्दीची विकास योजना शासनाने भागशः निर्णय क्र.टीपीएस/३५९९/ ७३८/सी.आर-१४२ (अ)/नवि-०९,दि.११/०२/२००२ अन्वये मंजुरी झालेली असुन दि.०७/०४/२००२ पासुन अंमलात आलेली आहे. त्यानंतर शासनाने निर्णय क्र.टीपीएस/३५०३/४९३/सीआर-१०२ (अ)/०३/नवि-०९,दि.१०/०८/२००४ अन्वये वगळलेल्या भागाची वाढीव हद्दीची विकास योजना दि.०१/१०/२००४ पासुन अंमलात आलेली आहे.

मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावाप्रमाणे निमखेडी शिवारातील गट नं..६६, जळगाव शिवारातील स.नं.,३०७, ३११, ३१२, ३१८,३१९,३२३,३२५, ३२६,३२७,३२८,३५३,४१६, ४१९, ४२०,४२१,४२२, ४२३,४२९, ४३१, ४३२, ४३३,४२९,४३४, ४५७,४५८, ४६३,४६४, ४६८,४६९,४७२,४७६, ४७७, ४८२ मधुन आखणी दर्शविलेली असुन वाढीव हद्दीच्या प्रारुप विकास योजना तयार करुन पाटबंधारे विभाग़ाने प्रस्तावित वाघुर कॅनालची आखणी प्रमाणे विकास योजना नकाशावर पाटचारीची आखणी दर्शविणे बाबत विनंती केलेली होती. त्यानुसार प्रारुप विकास योजनाच्या नकाशावर वाघुर कॅनालची आखणी दर्शविलेली आहे. सदर वाघुर कॅनाल बाधित शेतक-यांनी कार्यकारी अभियंता वाघुर धरण विभाग जळगाव यांचेशी संपर्क साधला असता कार्यकारी अभियंता वाघुर धरण विभाग़ यांनी मौजे जळगाव स.नं.३४५ मधुन वाघुर कालव्याची पाटचारी जात नसल्याचा दाखल दिला आहे. त्यानंतर स.नं.३२५/१ व ३२७/२ मधुन वाघुर कॅनालची संरेखा रद्द केल्याचे कळविले आहे, त्याप्रमाणे स.नं.४१६ भाग मधिल पाटचारी रद्द केल्याचा दाखला पाटबंधारे विभागाने दिलेला आहे.त्यानुसार उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठाने याचिका क्र.३०२१/२०१५ व याचिका क्र.३१३८/२०१५ मध्ये पाटचारीची आखणी रद्द करुन विकास परवानगी देण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. पाटबंधारे विभागाने विकास योजना नकाशावर दर्शविलेली आखणी रद्द केलेली आहे. कालव्यासाठी आखणी रद्द केलेला साक्षांकीत नकाशा कार्याकारी अभियंया,वाघुर धरण विभाग यांनी दिलेला आहे. त्यामुळे संबंधीत शेतकरी विकास परवानगी साठी म.न.पाकडे अर्ज करीत आहेत. परंतु मंजुर विकास योजना नकाशावरील वाघुर कॅनालची आखणी शासनाने रद्द करणे आवश्यक आहे. व त्यासाठी जळगाव म.न.पाने म.प्रा व न.र अधिनियम चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणे कामी फेरबदलाचा प्रस्ताव कार्यन्वीत करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :-**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१३२, 'प्राथमिक शाळा व क्रिडांगण' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.४५४/२अ या जमिनीपैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकड्डन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. कुलभुषण पाटील :-** प्रशासनाकडुन सदर प्रस्ताव अपूर्ण आलेला आहे तरी सदर प्रस्तावात परिपुर्ण माहिती देण्यात येवुन पुढील महासभेमध्ये सादर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) आरक्षण क्र.१३२, **'**प्राथमिक शाळा व क्रिडांगण**'** या जमिनीच्या संपादनासंबंधी प्रस्तावात जागेचे क्षेत्रफळ किती वगैर बाबींची सविस्तर व परिपुर्ण माहिति नसल्यामुळे सदरचा परिपूर्ण अदयावत माहीतीसह प्रस्ताव पुढील महासभेत सादर करणेत यावा तो पावेतो सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यात येत आहे व प्रशासनाने यापूढे भुसंपादनाचे कोणतेही प्रस्ताव मोघम व अपूर्ण सादर करु नयेत.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२/३/१/अ या जमिनीतुन आ.क्र.४५ भागश: प्ले ग्राऊंड व स.नं.११५/२/३/१/ब या जमिनीतुन आ.क्र.४६ भागश: विस्तारीत हायस्कुल या प्रयोजनार्थ विकास योजने मध्ये बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.धिरज सोनवणे :- सदर प्रस्तावासाठी प्रशासनाने डॉ.श्री.अश्विन सोनवणे, श्री.भगतराम बालाणी, श्री.जितेंद्र मराठे यांची एक समिती बनवुन या समिती मार्फत अहवाल सादर करावा.

श्री.नितीन लढढा :- या संदर्भात पुर्वी सुध्दा ठराव झालेला होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने आपण ही भुमिका स्विकारली होती की, जमिन मालकाला टि.डी.आर.देण्याच्या संदर्भात विनंती करावी. टि.डी.आर. घेण्या संदर्भात विनंती सुध्दा केली. परंतु जमिन मालकाने टि.डी.आर. घेण्यास स्पष्ट नाकार दिलेला आहे. आज आपल्या समोर विषय इतकाच आहे की भुसंपादनाची कार्यवाही सुरु करावी. अन्यथा ते आरक्षण व्यापगत होईल त्या करता सोडुन द्यायचे. हे दोनच भुमिका आपल्या समोर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२/३/१/अ या जमिनीतुन आ.क्र.४५ भागश: प्ले ग्राऊंड व स.नं.११५/२/३/१/ब या जमिनीतुन आ.क्र.४६ भागश: विस्तारीत हायस्कुल या प्रयोजनार्थ विकास योजने मध्ये बाधीत जमिनीचे भुसंपादना विषयी डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे,उपमहापौर, श्री.भगतराम रावलमल बालाणी, गटनेता (भा.ज.पा.), श्री.जितेंद्र भगवानराव मराठे, सभापती, स्थायी समिती यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करणेत येत असुन सदर समितीने उपरोक्त प्रस्तावाचा सखोल अभ्यास करुन महासभेत अहवाल सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांवच्या न्यायालयीन इमारतीकरीता जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली ट्रॅफीक गार्डनची जागा मंजुर करणे बाबत प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधिश यांचेकडील पत्र म.जा.क्र/काव्यवि/प्र.शा.३२५९/२०१९ दि.०८/०५/२०१९ चे अनुषंगाने प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

ॲड सौ.शुचिता हाडा :- सद्या असलेले जे न्यायालय आहे ते माझ्याच प्रभागात आहे. आणि आता जी नविन जागेची मागणी केलेली आहे ते सुध्दा माझ्याच प्रभागात आहे. मी स्वत: वकील आहे. जळगांव वकील संघाची सदस्या आहे त्याच्यामुळे या विषयाचे महत्व मला स्वत:ला आहे.सदरची जी न्यायालयाची अवस्था आहे, न्यायाधिशांची संख्या वाढत आहे, म्हणजेच कोर्टसची संख्या वाढलेली आहे. त्यामुळे ती जागा खुप कमी पडत आहे. वकीलांची संख्या वाढत आहे, लिटीगेशन्स वाढत आहे. पक्षकार वाढत आहे, पक्षकार हे जिल्ह्या भरातुन येतात फक्त जळगांवकर नसतात पुर्ण जिल्ह्यातले नागरीक असतात. ही जी जागा आहे रेल्वे स्टेशन आणि बस स्टॅण्ड दोन्ही कडुन सोईची आहे. म्हणजेच बाहेरगावाहुन येणाऱ्या पक्षकारांना सुध्दा Easily Approach मिळत आहे. अतिशय उत्तम जागा आहे. त्यामुळे कोर्टाने जी मागणी केलेली आहे. त्यामुळे तिथे सिव्हीक सेंटरचे आरक्षण आहे. त्यामुळे आपल्याला डायरेक्टली देता येणार नाही. कायद्याच्या बदलासाठी आपण शिफारस करावी, तसा ठराव करावा आणि ती जागा न्यायालयाला देण्याचा मार्ग मोकळा करावा.

श्री.इब्राहिम पटेल :- महापौर साहेबा, मिर शुक्रुल्ला त्यांचा नांव आपण दिलेलं आहे. मगाशी त्याच्यासाठी आपण रु.९० लाख फंड पण दिला होता. पण आपण ते खर्च करु शकले नाही. हे जे मिर शुक्रुल्ला आहे, हे स्वातंत्र्याच्या काळात खान्देश

कागदी म्हणुन आपल्याला परिचीत आहे. आणि त्याचमुळे आपण याला मिर शुक्रुल्ला ट्रॅफिक गार्डन नांव दिलेलं आहे. जर शासन त्या जागेच्या बदले दुसरी जागा देत असेल तर त्या जागेला ही मिर शुक्रुल्ला असे नांव देण्यात यावे.

श्री.नितीन लढढा :- मा.महापौरताई, खऱ्या अर्थाने जर बघितले, जागा जरी शासनाची असली तरी त्या जागी महानगरपालिकेचे आरक्षण आहे. सिव्हीक सेंटरच एक आरक्षण आहे आणि उद्यानाचा एक आरक्षण आहे. या जमिनीवर योग्य पध्दतीने जर तपास झाला. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा अभियंता श्री.डी.एस.खडके यांची जागा महानगरपालिकेने भुसंपादन करुन घेतली होती. अशी माहिती स्वत: श्री.डी.एस.खडके यांनी मला एकावेळी मला दिलेली होती. रितसर त्याची भुसंपादन प्रक्रिया पार पाडलेली होती. त्यांना मोबदला मिळाला हे सुध्दा ते मान्य करतात. ज्या पध्दतीने घरकुलच्या जागेला महानगरपालिकेच नांव लावणं राहुन गेलं परंतु त्याचे मुळ दस्तऐवज नगरपालिकेच्या दप्तरी आढळ होत नाही. किंवा शोधण्याचा गांर्भियपुर्वक प्रयत्न झालेला नाही. मध्यंतरी मा.श्री.किशोर राजे निंबाळकर साहेब जिल्हाधिकारी होते आणि महानगरपालिका आयुक्त ही होते. त्या वेळेला या जागेचा विकास करण्याच्या संदर्भात १ कोटी रुपयांची तरतुद त्याच्यामध्ये केलेली होती. १ कोटीचा निधी आमदार आणि खासदार यांच्या निधीतुन उभारायचा होता. २ कोटी रुपयांमध्ये त्या उद्यानाचा विकास करायचा होता. या जागेचा महानगरपालिकेने कागदपत्र शोधुन सुध्दा सापडत नाही. सिटी सर्व्हेला त्याचा ७/१२ च ओपन झाला नाही. ७/१२ ओपन झाला नसल्याने त्या जागेची मालकी कोणाची हा संभ्रम कायम आहे. परंतु अश्या परिस्थितीमध्ये एखादी जागा अश्या पध्दतीने पडलेले असेल आणि त्याच्यावरती मालकी हक्काचा कोणीही दावा करत नसेल शेवटी ही जागा शासनाची आहे असे गृहीत धरले जाते. त्यामुळे आपण याला महाराष्ट्र शासनाच नांव लावुन घ्यावे. शासनाच नांव लागले नंतर आरक्षणाखाली ही जागा महानगरपालिकेला देण्याची तरतुद आहे. म्हणजे ही जमिनीवर महानगरपालिकेचा संपुर्णता आज ही हक्क आहे. जरी नांव शासनाच असल तरी त्या अनुषंगाने भाऊच्या उद्यानाची जमिन सुध्दा राज्य शासनाची होती. परंतु त्याच्यावर ती आरक्षण खाली ही जमिन आपल्याकडे नाममात्र एक रुपयाने प्राप्त करुन घेतलेली होती. वाद तो नाही आहे वाद हा आहे की जिल्हा न्यायालय आज नागरीकांच्या दृष्टीकोनातुन हे न्यायालय सोईचं करणे स्वभाविक आहे. ती सुध्दा जागा महानगरपालिकेची आहे. ती सांभाळणे सुध्दा आपली जबाबदारी आहे. परंतु एका अर्थाने बघितलं तर दोन्ही ही शहराशी निगळीत बाबी आहे. राहिला प्रश्न आता फक्त स्वतंत्र सैनाणी मिर शुक्रुल्ला उद्यानाचा नांव, मला असा वाटतं की कुठेतरी या नांवाची स्मृती राहावी. असा पध्दतीचा आपण ठराव करावा की जेणे करुन सदरहु जागेत कुठेतरी मिर शुक्रुल्ला यांचे नांव असावे. कारण न्यायालयाला आपण नांव देऊ शकत नाही. कारण ते आपला अधिकार नाही. त्या ठिकाणी कुठेतरी एका जागेला मिर शुक्रुल्ला नांव द्यावा असा ठराव करावा.

श्री.सुनिल खडके :- महापौर महोदया, जी कोर्टाची भिंत आहे ती अतिक्रमण मध्ये आहे तरी ती त्यांना विनंती करुन मध्ये करण्यात यावी.

***सन्मा.सदस्या श्रीमती सुन्नाबी राजु देशमुख यांनी दिलेली लेखी सुचना खालील प्रमाणे,**

आजच्या आपल्या महासभेतील अजेंड्यातील एक विषय ३ शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ट्राफिक गार्डन (खान्देश गांधी मीर शुकरुल्ला उद्यान) न्यायालयाच्या नवीन इमारत बांधणीसाठी देणेबाबत अत्यंत चुकीचा असुन एका महान स्वातंत्र्य सेनानी ज्यांनी आपण खान्देश गांधी मीर शुकरुल्ला उद्यान पुर्वी शिवाजी नगर येथे आजच्या भिकमचंद जैन हॉस्पिटलच्या जागेवर होते, परंतु शिवाजी नगर सारख्या मोठी लोकवस्ती असलेल्या ठिकाणी एका मोठ्या दवाखान्याची आवश्यकता पाहुन या उद्यानाच्या जागी हॉस्पिटल बनवुन ते उद्यान आताच्या मध्यवर्ती जागेत बनवण्याचा निर्णय तत्कालीन नगरपालिकेने घेतला व त्याप्रमाणे केले. परंतु आज पुन्हा या उद्यानाची जागा न्यायालयासाठी देणे चुकीचे आहे, एकतर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या उद्यानाची दुर्दशा दुर करण्यासाठी कोणतेही पाउल उचलले गेले नाही उलट आता ते पार अदृश्य करण्याचा घाट घातला जात आहे. ज्या खान्देश गांधीमुळे या प्रदेशाला नावलौकिक प्राप्त झाले आहे त्यांच्याशी ही प्रतारणा ? आपण या उद्यानाच्या नवीन जागेबाबत ही काही विषय काढलेला नाही व न्यायालय

अश्या वर्दळीच्या ठिकाणी सुरु झाल्यास स्थानिक नागरीकांना होणाऱ्या त्रासाचाही विचार केलेला दिसत नाही, एकतर आताच्या न्यायालयापासुन गणेश कॉलनी पर्यंतचा रस्ता हा अत्यंत गर्दीचा व गैरसोईचा आहे. त्यात न्यायालयाची भर पडल्यास काय होईल ? न्यायालया शहरापासुन फार लांब नाही पण नवीन वसाहती बनत असलेल्या परिसरात मोठया जागेत बनवता येऊ शकते ही शक्यता आपण पडताळुन पाहिल्याचे दिसत नाही.

तरी शहराच्या मध्यवर्ती असलेले व शहराची गरज असलेले एका महान स्वातंत्र्य सेनानीची स्मृति कायम ठेवणारे हे उद्यान आहे त्याच ठिकाणी ठेवणे एव्हढेच कर्तव्य न निभवता त्याच्या पुनरुज्जीवनासाठी योग्य तो निधि आपण महापालिकेतुन द्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराकरीता शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस.३५८८/१९४/सि.आर-९७/युडी-९ दि.०६/०१/१९९३ अन्वये सुधारीत विकास योजना जळगांव (जुनी हद्दी) मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.१५/०२/१९९३ पासुन अंमलात आलेली आहे. सदर मंजुर विकास योजनेच्या प्रस्तावानुसार जळगांव येथील सि.स.नं.९१८२, स.नं.२७५ ची जमिन आ.क्र.८५ 'उदयान' व आ.क्र.८६ 'सिव्हीक सेंटर' या सार्वजनिक कारणासाठी आरक्षित आहे. त्याचप्रमाणे सदर जमिनीवर अस्तित्वातील ट्राफिक गार्डन असुन, सदर जमिनीची मालकी हक्कावर महाराष्ट्र शासनाचे नाव आहे. सदरची जमिन न्यायालयीन इमारतीसाठी मिळणेबाबत जिल्हा न्यायालयाने विनंती केलेली आहे.

सदर जमिन सार्वजनिक कारणास्तव आरक्षीत असल्याने न्यायालयीन इमारतीसाठी वितरीत करण्याची सदयस्थितीत शिफारस करता येणार नाही. तथापि सदरची जमिन न्यायालयालगत असल्याने न्यायालयाच्या वाढीसाठी आरक्षित करण्यासाठी म.प्रा.व न.र.अधिनियम चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन आ.क्र.८५ उदयान व आ.क्र.८६ सिव्हिक सेंटर चे आरक्षण वगळून जिल्हा न्यायालयासाठी आरक्षित करणे कामी फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापी सदर जमिनीचे बदल्यात शासनाकडुन तेवढीच पर्यायी जागा महापालिकेस उपलब्ध करुन देणेबाबत शासनास विनंती करणेत यावी.

सदर प्रकरणी प्रशासनाने शासन आदेश/निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ६५ प्रतिकुल मते :- ०१**

**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** मंजुर विकास योजना जळगांव (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१७० 'टाऊन हॉल व लायब्ररी' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.२५७/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादनाबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.कैलास सोनवणे :- विषय क्र.६,७,९ सारखे आहेत विषय क्र.०८ घ्या.

श्री.ईब्राहिम पटेल :- महापौरताई, जी ठरावाची जागा आहे. ती जागा भंगार बाजाराला लागुन आहे मागच्या बाजुला आहे आणि त्यांच्याकडुन ५९५ स्के.फुट जागा काही वाटाघाटी करुन घेतलेली आहे. उरलेली जी जागा आहे ती बाकी आहे. परत परत भंगारबाजाराचा विषय येतो. अतिक्रमणाबाबत आमची काही मंडळी पुढे करता ते विषय. ते विषय ही आहे.

श्री.कैलास सोनवणे :- या रस्त्यावर भंगारबाजारच भविष्यच अवलंबुन आहे. बोला तुम्ही.

श्री.ईब्राहिम पटेल :- जर टी.डी.आर.मध्ये ही महानगरपालिका जागा कोणीही घेतली नाही तर भंगार बाजार असोसिएशन म्हणुन आम्ही ही जागा स्वखर्चाने घेण्यासाठी तयार आहे.

श्री.नितीन लढढा :- या प्रस्तावाच्या संदर्भात थोडक्यात मी सांगतो की, साधारणत: रु.९,२९,९,९००/- याची नोटीस जमिन मालकाने महानगरपालिकेला दिलेली आहे. याच्या संदर्भामध्ये दोन प्रक्रिया आहे. जसा टी.डी.आर. देण्याच्या संदर्भात प्रस्ताव देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने आजच्या सभेमध्ये तो निर्णय घेण्यात यावा. सदरहु जमिन मालकाला

टी.डी.आर. देण्यास तयार आहे का ? ती औपचारीकता पुर्ण करावी ती औपचारीकता पुर्ण झाल्यानंतर जमिन मालक जर टी.डी.आर. घेत नसेल तर महानगरपालिकाने भुसंपादनाची कार्यवाही सुरु करावी. त्यामध्ये महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, जर महानगरपालिकेला ९ कोटी ३० लक्ष रुपये देणे शक्य नसेल तर महानगरपालिकेला सदरहु भंगारबाजार असोसिएशन त्याच्यावरची रक्कम म्हणजेच ९ कोटी ३० लक्ष रुपये जमिन मालकाला देऊन त्याच्यावरचा नफा महानगरपालिकेला मिळेल, उत्पन्न होईल. ही जागेचा विकास सुध्दा साध्य होईल.महानगरपालिकेला त्याच्यातुन दोन पैसेंचा उत्पन्न सुध्दा होऊ शकेल. टी.डी.आर.चा मोबदला देत असतील आनंदाची गोष्ट आहे. नाही देत असतील पुढचा विषय भंगार बाजाराशी संबंधीत आहे. त्यांना ही भविष्याची चिंता आहे. की कायदेशीर अडचणीमुळे त्यांना खाली कराव लागलं तर त्यांची पर्यायी व्यवस्था मागच्या स्वत:च्या जागेमध्ये होऊ शकते. त्याच्यामध्ये महानगरपालिकेचा आर्थिक हित ही जोपासला जाते आणि यांना सुध्दा न्याय मिळण्याच्या दृष्टीकोणातुन ही भुमिका स्विकारली जाऊ शकते.

श्री.कैलास सोनवणे :- तुम्ही सांगा ते विषय.

श्री.नितीन लढढा :- टी.डी.आर.च्या मोबदल्यात ते रस्ता देण्यास सकारात्मक होते. तो त्यांच्याच ले आऊट मधुन जाण्यामुळे ती त्यांची समज होती. परंतु त्यांची दुसरी अट ही होती. तो रस्ता जो आहे तो स्वत: श्री.प्रविण वासुदेव खडके स्वखर्चाने विकसीत करतील. आणि स्वत: विकसीत केल्यानंतर जी काही डी.एस.आर.रेटच्या अनुषंगाने होणारी स्टीमेटेड व्हॅल्यु आहे ती व्हॅल्यु प्रमाणे तेव्हढया मोबदल्याचा टि.डी.आर.त्यांना अपेक्षित होता. जर कॅंक्रीटचा असता तर कॅंक्रीटचा आणि जर असफॅल्टींगचा केलेला असला तर त्याच्या किंमती प्रमाणे टि.डी.आर.ची त्यांनी मागणी केली होती. परंतु त्यावेळेस तत्कालीन सहा.नगररचनाकार निकम साहेबांनी त्या विषयाला अत्यंत नाकारात्मक दृष्टीकोणातुन बघितलं होतं. साधारणत: त्यांची मागणी कुठल्याना कुठल्या कारणाने फेटाळली गेली होती. आणि त्यामुळे रु.५.५ कोटीचा प्रस्ताव सभेसमोर आलेला आहे. ५.५ कोटी रुपये महानगरपालिकेचे वाचले असते. संपुर्ण रस्ता हा कॉंक्रीटींग मध्ये किंवा डांबरीकरण मध्ये विकसीत झाला असता. त्या वेळेला एक नया पैसा ही महानगरपालिकेला लागला नसता. परंतु त्योवेळी अधिकाऱ्यांचा हेकेखोरपणा, त्यांनी या संदर्भात तीन ते चार वेळा बैठकी घेतली. परंतु त्यांना सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे शेवटी त्यांनी १२७ ची नोटीस दिली. ती नोटीस त्यांनी महासभेसमोर न ठेवता पुनश्च चर्चाला बोलविले होते. पुनश्च प्रशासनाला विनंती केलेली होती. आणि पयार्याने ते उच्च न्यायालयात गेले. आणि उच्च न्यायालयात त्यांना आदेश मिळुन ५ कोटी ५० लाख रुपये मागणीचा प्रस्ताव दिला. पुनश्च त्यांना विनंती करावी. आणि त्यांना त्यांच्या प्रमाणे टि.डी.आर.देण्याचा विनंती करावी. शेवटी तेही आपल्या शहरातले स्थानिक लोकं आहे. सगळयांचा विचार त्यांनी करायलाच पाहिजे.जर आपण अशी भुमिका ठेवली की आम्ही फक्त टि.डी.आर.देऊ भुसंपादन करणार नाही तर तो डिप्टो लॅप्स होईल आणि डिप्टो लॅप्स होणे म्हणजे शहरातील रस्त्यांचा नियोजन जे आहे ते बिघडेल. या दृष्टीकोणातुन पुनश्च विचार करावा आणि त्यांना विनंती करावी.

श्री.कैलास सोनवणे :- मी काय म्हणत आहे. तुम्ही आता जी माहिती मांडली दुसऱ्या विषयापासुन ते आता पर्यंत, जी फाईली असतात त्यात हे सगळं की सगळं असतं

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (वाढीव हद्द) आरक्षण क्र.१७० 'टाऊन हॉल व लायब्ररी' या जमिनीच्या संपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक सौ.ज्योती बाळू चाटे यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक सौ.ज्योती बाळू चाटे यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१८४ ' दुकान केंद्र' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.२९/अ/१/अ/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये आरक्षण क्र.१८४ ' दुकान केंद्र ' अंतर्गत मौजे मेहरुण शिवार स.नं.२९/अ/१/अ/१ या जमिनी पैकी बाधीत जमिनीचे संपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक किस्टोन कन्ट्रक्शन प्रा.लि.जळगांव यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक किस्टोन कन्ट्रक्शन प्रा.लि.जळगांव यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** नगररचना योजना जळगांव क्र.२ अंतिम भुखंड क्र.१६७ ब मनपाच्या ताब्यात घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

ॲड.सौ.शुचिता हाडा :- ही जी रेडक्रॉसच्या मागची जागा आहे. ती मीच पुर्वी पत्र देऊन लक्षात आणुन दिले होते. गेल्या काही वर्षापासुन पडुन आहे. नंतर इतर ज्या जागा असतील महापालिकेची हक्काची जागा पडुन आहे हे खर तर प्रशासनाचे काम होते अधिकाऱ्यांनी हे शोधुन काढले पाहीजे की इतरही स्त्रोत असतो कारण महापालिकेकडे पैसा नाही विकास कामे सोडुनच द्या आपण विकास कामांचे पेमेंट सुध्दा वेळेवर करू शकत नाही आणि अश्या वेळेला ज्या मोक्याच्या जागा उत्पन्नाचा खुप चांगला स्त्रोत असु शकतो त्या आपल्याकडुन दुर्लक्षित होत आहे अश्या वेळी सामान्य नगरसेविका लक्षवेधी मांडु शकते तर तुम्ही कशासाठी शोधुन काढत नाहीत , खरे तर या ठिकाणी एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याची फक्त या कामासाठी नियुक्ती होणे खुप आवश्यक आहे जर मग अश्या प्रकारच्या अनेक जागा आहेत ज्या आपल्या हक्कच्या जागा आहेत ज्याच्या पासुन आपण उत्पन्न कमवु शकणार आहोत तरी सुध्दा त्याकडे आपले लक्षच नाही मागील सभेमध्ये मी लक्षवेधी मांडली अनेक जागा आहेत तसेच आपण ८१ ब प्रमाणे घेवु त्या जागांवर काहीतरी उत्पन्नाच्या स्त्रोत आपण चालु करू शकतो आहे याचे सुध्दा महासभेपुढे उदाहरण मांडण्याची गरज नाही नर्सिंग असोसिएशन करीता जागा दिलेली होती माझ्या पत्रानंतर भोळे साहेबांनी जो पत्रव्यवहार केला त्याचे काय झालेले आहे तशी आपली संस्था वर गेलेलीच नाही जर त्या जागेचा काहीच उपयोग करीत नाहीत तर आपण ती जागा ताब्यात घेवु शकतो त्याचा आपल्याला पुर्ण अधिकार आहे. महासभेची सुध्दा परवानगी घ्यायची गरज नव्हती ठिक आहे हा विषय महासभेसमोर आलेला आहे महासभा तो ठराव करून घेणार पण हे मी एक नोंद करू ईच्छिते की प्रशासनाला अधिकार आहेत , प्रशासन सुध्दा ताब्यात घेवु शकतो आपल्या समोर मांडु ईच्छिते की हया जागेकरीता सुध्दा ७ कोटी रू ची मागणी आहे हयांना नाही द्यायची तर देवु नका विकु नका पण त्यावर आपण विकास करू शकतो तसेच उत्पन्न वाढवु शकतो आणि अश्या अनेक जागा आहेत आता लगेच मी सांगते मेहरूणचीच एक जागा आहे जे के पार्क ची जागा आपण तशीच दिलेली आहे का ? त्याच्या सुध्दा अटी शर्तीचा भंग झालेला आहे आजच्या तारखेत आपण त्याच्यावर ८१ ब नुसार कार्यवाही करू शकतो व ती जागा आपण ताब्यात घेवु शकतो माझ्या माहिती प्रमाणे ३१ डिसेंबर २०१९ ला त्याची मुदत संपते आहे. परंतु कार्यवाही ८१ ब

प्रमाणे झालेली नाही पण नियमांचा भंग झालेला आहे त्यामुळे आज ती जागा आपण ताब्यात घेवु शकतो यामधुन सुध्दा आपण उत्पन्न वाढवु शकतो या ठिकाणी ही सुचना मांडायची आहे की , एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करा खास या कामासाठी की त्या अधिकाऱ्याचे कामच हे राहील की महापालिकेच्या पडलेल्या जागा शोधुन काढणे त्या महापालिकेच्या ताब्यात घेणे आणि त्यावर उत्पन्न कसे निर्मीती करता येईल हे ठरविणे हि विनंती व सुचना आहे आणि हया गोष्टीची नोंद घ्यावी.

श्री.नितीन लढढा :- ही बॉडी अस्तीत्त्वात आल्यानंतर साधारणत: तिसऱ्यांदा हा विषय करत आहे. मेहरुण परिसरात असलेले घरकुल आरक्षण क्र.१३२,मुळ जमिन मालकाला सन २००० साली आपण ती जागा संमपादीत केली होती. त्याचा वाढीव मोबदला ४ कोटी ३२ लाख साधारणता दिड वर्षापुर्वी दिला. आपण मागच्या टर्मपासुन ते आजपावेतो पाचव्यांदा सहाव्यांदा चर्चा करत आहे. परंतु आपला हे समजत नाही की जमीनीचा मोबदला कोट्टयावधी रुपयात दिलेला आहे. आणि कोटी रुपये दिल्यानंतर सुध्दा जमिन मालक क्षेत्रचा काही हिस्सा आजही वापरत आहे. तुम्ही ती जागा बघाल तर वरती ढोरे बांधलेले आहे. चारा ठेवलेला आहे. समोरची जी घरकुलची जागा आहे.ती सुध्दा कोट्टयावधी रुपयांची आहे. मोकेच्या ठिकाणी असलेल्या जागा तातडीने वर्षानुवर्ष सभागृह सदस्य बघत असतील आणि घेतले जात नसतील. रुटीन बिगडुन जाते आणि वेगवेगळया अनधिकृत रित्या लोक कब्जा करुन घेता. तर या अनुषंगाने प्रशासनाने या सर्व गोष्टींची गांभिर्याने नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करावी ही विनंती.

ॲड.सौ.शुचिता हाडा :- आपली १ जागा रेडक्रॉसच्या मागे १५००० स्के.फुट जागा पडलेली आहे. तसेच मेहरुण मध्ये जे.के. पार्कची सुध्दा जागा आहे. ती जागा ज्यांना दिली आहे. त्यांनी नियमाचा भंग केलेला आहे. व ८१ ब नुसार आपण ताब्यात घेवु शकतो. विकसीत करु शकतो. त्यात जळगांव शहराच्या सौंदर्यामध्ये सुध्दा भर पडेल आणि उत्पन्नात सुध्दा भर पडेल.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नगररचना योजना जळगांव क्र.२ अंतिम भुखंड क्र.१६७ ब (सि.स.नं.१९६५/अ/१) हा मिळकत पत्रिका उताऱ्यानुसार अध्यक्ष नगरपरिषद जळगांव व भाडेकरु नर्सिंग असोशिएशन जळगांव या नावाने आहे. सदर भुखंडाबाबत पुर्वीचा मिळकत पत्रिकेचा उताऱ्याचे अवलोकन केले असता ३८०X४० फुट = १५२०० फुट ही जागा ९९ वर्षाच्या कराराने नर्सिंग असोशिएशन जळगांव यांना भाडयाने दिलेली आहे. मनपाने भाडयाने जागा दिलेली असली तरी त्या बाबतची कोणतीही कागदपत्रे मनपाच्या अभिलेखी आढळुन येत नाही. सदर संस्थेची नोंदणी झाली आहे किंवा त्यांचा पत्ता पाठविणे बाबत कार्यालय अधिक्षक धर्मदाय आयुक्त जळगांव यांना दि.२३/०५/२०१८ च्या पत्रान्वये विनंती केलेली होती. त्यावर धर्मदाय आयुक्त यांचेकडील पत्र जा.क्र/आस्था/१९२७,दि.२९/०५/२०१९ अन्वये नर्सिंग असोशिएशन जळगांव या नावाच्या संस्थेची धर्मदाय आयुक्त कार्यालयात नोंद झालेली दिसुन येत नाही, असे कळविले आहे.

नर्सिंग असोशिएशन जळगांव यांचा ठावठिकाणा लागत नसल्याने तसेच सन्मा.सदस्या सौ.शुचिता हाडा यांच्या अर्जात नमुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम ८१ ब ची कार्यवाही कोणाच्या नावाने करावी याचा बोध होत नाही. कारण सदर संस्था आज रोजी अस्तिवात नाही. त्यामुळे सदरची नर्सिंग असोशिएशन जळगांव यांना वितरीत केलेली नगररचना योजना जळगांव क्र.०२ अ.भु.क्र.१६७/ब क्षेत्र १४१२.२० चौ.मी.जागा रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेकामी दैनिक वर्तमान पत्रात तसेच सदर जागेवर नोटीस प्रसिध्द करुन जागा तात्काळ ताब्यात घेणेची कार्यवाही करावी.

तसेच मनपा हद्दीत अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या ज्या जागा पडून आहेत त्यांचा शोध घेणेत यावा व याकामी एका स्वतंत्र अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येवुन सदरच्या जागा तात्काळ महापालिकेच्या ताब्यात घेणेची कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश / निर्देशानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजित**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** रिट याचिका क्र.१३५२२/२०१८ मे.सर्व्हेश्र्वर असोशिएट,श्री.प्रवीण वासुदेव खडके विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर. जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२+३/१ (सि.स.नं.३४६५/१) या जमिनीतुन १८.०० मी. रुंद मंजुर विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजनेतील (जुनी हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.११५/२+३/१ (सि.स.नं.३४६५/१) या जमिनीतुन १८.०० मी. रुंद मंजुर विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे संपादनासंबंधी म.प्रा. व न.र.अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके, भागीदार मे.सर्व्हेश्र्वर असोशिएट,जळगांव यांनी नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे मात्र महानगरपालिकेची आर्थिक स्थितीचा विचार करता जमिन मालक श्री.प्रवीण वासुदेव खडके, भागीदार मे.सर्व्हेश्र्वर असोशिएट,जळगांव यांना उक्त बाधीत जमिनीचे भुसंपादनासंबंधी आर्थिक मोबदला देण्याऐवजी टि.डि.आर. देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००

सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ

अनुमोदक :- पाटील विजय पुंडलिक

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** महासभा ठराव क्र.१९५ दि.२०/०२/२०१५ मध्ये दुरुस्ती करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, रामदास कॉलनी टि.पी.एस.-३ एफ.पी.नं."सी" ही जागा बगीचा म्हणून आरक्षीत आहे.महासभा ठराव क्र.१९५ दि.२०/०२/२०१५ नुसार या उद्यानास "स्व.निखील एकनाथ खडसे स्मृती उद्यान रामदास कॉलनी" असे नांव देण्यात आले असून ही जागा विकसीत करण्याकरीता कोणताही शासकीय अथवा मनपाचे आर्थीक सहाय्य घेणार नसून मनपाला या बाबत कोणताही खर्च लागणार नाही असे ठरावात नमुद आहे सदर बगीचा अदयाप पर्यंत विकसीत झालेला नाही.

दिनांक ०८/०७/२०१९ रोजी सौ.उज्वला मोहन बेंडाळे मनपा सदस्य (प्रभाग क्र.१२) यांनी मा.महापौर यांना पत्र देऊन सदर ठरावात खालील प्रमाणे बदल करण्यात यावा अशी विनंती पत्राव्दारे केलेली आहे.

प्रशासनाने प्रस्तावित केलेनुसार "नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड क्र."सी" या ठिकाणी मनपाने शासनाकडून प्राप्त होणा-या निधीतून किंवा मनपा फंडातुन किंवा इतर निधीतून बगीचा विकसीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत असून त्याप्रमाणे ठरावात दुरुस्ती करणेस सुध्दा मान्यता प्रदान करणेत येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजित**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** सि.स.क्र.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा. ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबतचा प्रस्ताव दि.०५/०३/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष महासभेतील विषयपत्रिकेतील विषय क्रं.२ अन्वये प्रशासनाकडुन सादर करण्यात आलेला होता. सदरचा प्रस्ताव विशेष महासभा ठराव क्रं.११७ दि.०५/०३/२०१९ अन्वये अनिश्चित काळासाठी तहकूब ठेवणेत आलेला आहे तरी सदर प्रस्तावावर पूर्न विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** या विषया संदर्भात जी समिती गठीत केलेली आहे. नवनाथ विश्वनाथ दारकुंडे, शेख हसीनाबी शरीफ आणि भगत बालाणी असे तीन लोकांची समिती गठीत केलेली आहे. तर त्या समितीचा अहवाल आल्यानंतरच ठराव करण्यात यावा.

**श्री.**नितीन लढढा :- प्रत्येक समितीमध्ये तौलनिक संख्याबळानुसार सदस्य असतो. तर आमच्या कडुन त्या समितीत श्री.इब्राहिम मुसा पटेल यांचा समावेश करण्यात यावा.

**श्री.**कैलास सोनवणे :- तुमच्या नावाचे दुकान आहे तेथे मग तुम्हाला कसे घेवु शकता. एम.आय.एम.चा घेऊन टाका.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सि.स.क्र.२९-ब हल्लीचा भंगार बाजार ९९ वर्षाकरीता भाडेतत्वाने देणेबाबतचा तत्कालीन न.पा. ठराव क्र.३३७ दि.२५/१०/१९९७ रद्द करणेबाबतचा प्रस्ताव दि.०५/०३/२०१९ रोजी संपन्न झालेल्या विशेष महासभेतील विषयपत्रिकेतील विषय क्रं.२ अन्वये प्रशासनाकडुन सादर करण्यात आलेला होता. सदरचा प्रस्ताव विशेष महासभा ठराव क्रं.११७ दि.०५/०३/२०१९ अन्वये अनिश्चित काळासाठी तहकूब ठेवणेत आलेला आहे तरी सदर प्रस्तावावर पुर्न विचार करुन निर्णय घेणेकामी सन्मा.सदस्य श्री.नवनाथ विश्वराथ दारकुंडे, श्रीमती शेख हसीनाबी शरीफ, श्री.भगतराम रावलमल बालाणी तसेच बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम यांची समिती गठीत करणेत येत आहे. सदर समितीने प्रस्तावा बाबत सखोल अभ्यास करुन महासभेत अहवाल सादर करावा. समितीचा अहवाल येईपावेतो सदरचा विषय अनिश्चित काळासाठी तहकूब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- शेख हसीनाबी शरीफ**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्रं:-१२)** मनपा निधी अंतर्गत विदयुत दिवाबत्ती विभाग व पाणी पुरवठा विभागात केलेल्या कामापोटी कपात झालेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३,५४,६२१/- मात्र मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड, जळगांव यांना परत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत दिवाबत्ती विभगाअंतर्गत शहरात सौर ऊर्जेवर चालणारी सयंत्रे पुरविणे व बसविणे तसेच पाणी पुरवठा विभागाकडील पाईपलाईन टाकणे चे ४ कामे असे एकुण ५ कामाची कामी मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड,जळगांव यांची सुरक्षा अनामत पावती क्रं.७४१० दि.२२/०२/२००७ अन्वये रक्कम रु.३,५४,६२१/- मात्र सुरक्षा अनामत म्हणुन महापालिकेत जमा आहे.

मक्तेदार यांनी सदरचे काम कार्यादेशा नुसार दिलेलया मुदतीत पुर्ण करुन दिलेले आहे. सदरचे काम पुर्ण होवून ७ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड,जळगांव यांची मनपा खजिन्यात जमा असेली सुरक्षा अनामत परतावा रक्कम रु.३,५४,६२१/- मात्र मनपा लेखासंहिता चे कलम १६९ (४) अन्वये मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड,जळगांव यांना अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश / निर्देशानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- आहुजा मनोज नारायणदास**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- विषय क्रं:-१३)** महासभा ठराव क्रं.१६६ दिनांक०६/०६/२०१९ अन्वये महासभेने घेतलेल्या निर्णयानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३१ अ (१) व (२) मधील तरतूदीनुसार पक्षाचे तौलनिक संख्याबळानुसार विशेष समित्यांमध्ये सदस्यांचे समितीनिहाय नामनिर्देशन करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सुनिल महाजन :- आमचा काही विरोध नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१८२ पारित करण्यात आला.**

महासभा ठराव क्रं. १६६ दि.०६/०६/२०१९ अन्वये महानगरपालिकेत पुढील विशेष समित्या गठन करणे बाबत मान्यता प्रदान केलेली आहे. १) बांधकाम समिती २) अतिक्रमण समिती ३) स्वच्छता समिती ४) पाणी पुरवठा समिती ५) दवाखाना समिती ६) नियोजन समिती ७) आस्थापना समिती ८) विधी समिती ९) वाहन व्यवस्था समिती १०) शिक्षण समिती ११) विद्युत समिती, प्रत्येक समितीमध्ये ७ सदस्य असतील व प्रत्येक समितीमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ सदस्य व शिवसेना पक्षाचे २ सदस्य असे पक्षीय बलाबल ठेवणेत यावे असा ठराव पारीत करण्यांत आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३१ अ (१) व (२) अन्वये प्रत्येक समितीत ७-७ सदस्यांची नेमणूक करणेसाठी पक्षीय तौलनिक संख्याबळ निश्चित करण्यात आलेले असुन तसे गटनेता (तिन्ही), विरोधी पक्षनेता, सभागृह नेता यांना जा.क्रं ./ ज.श.म.न.पा/ न.स.का/५० /२०१९ दि.०४/०७/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

सदर विशेष समित्यांवर सदस्यांची नियुक्ती करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ **अ** (२) मधील तरतूदीनुसार महापौर यांनी उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, गटनेते (भाजपा, शिवसेना, एम.आय.एम) यांचेशी चर्चा व विचार विनिमय करून पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार सदस्य नियुक्त करणेकामी दिनांक .०६/०७/२०१९ रोजी दुपारी.०१.०० वाजता बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीस महापौर, उपमहापौर, गटनेता (भाजपा), तसेच गटनेता (एम.आय.एम) हे उपस्थित होते व विरोधी पक्ष नेता, गटनेता (शिवसेना) व सभागृह नेता हे अनुपस्थीत होते. तदनंतर यासंदर्भात पुनश्च दिनांक २०/०७/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता बैठक आयोजित केलेली होती, सदर बैठकीस गटनेता (भाजपा) हे उपस्थित होते मात्र उपमहापौर, सभागृह नेते (भाजपा), विरोधी पक्ष नेता (शिवसेना) व गटनेता (शिव सेना, एम.आय.एम) हे अनुपस्थीत होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ अ (२) तरतूदीनुसार व पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार विशेष समित्यांवर सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करणे संबंधात दि.०३/०८/२०१९ रोजी आयोजित केलेल्या महासभेत शिवसेना गटनेते व सदस्यांनी सभागृहात नामनिर्देशित सदस्यांची नावे देण्यास नकार दिलेला असून भा.ज.पा.गटनेते यांनी खाली नमूद केलेप्रमाणे विशेष समितीनिहाय बंद पाकीटात नामनिर्देशित सदस्यांची नांवे दिलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| **१) बांधकाम समिती**<br>१. पाटील कुलभुषण विरभान,समिती प्रमुख<br>२. सोनवणे मुकुंद भागवत - सदस्य<br>३. सोनवणे सुरेश माणिक - सदस्य<br>४. भोईटे लताबाई रणजित - सदस्या<br>५. पाटील उषा संतोष - सदस्या | **२) अतिक्रमण समिती**<br>१. बाविस्कर किशोर रमेश,समिती प्रमुख<br>२. सोनवणे कैलास नारायण - सदस्य<br>३. कोल्हे प्रविण रामदास - सदस्य<br>४. कापसे मयुर चंद्रकांत - सदस्य<br>५. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ - सदस्य | **३) स्वच्छता समिती**<br>१. सनकत चेतन गणेश, समिती प्रमुख<br>२. काळे रेश्मा कुंदन - सदस्या<br>३. तायडे सुरेखा नितिन - सदस्या<br>४. सपकाळे मिना धुडकु - सदस्या<br>५. नेरकर सरिता अनंत - सदस्या |
| **४) पाणी पुरवठा समिती**<br>१. काळे अमित पांडुरंग, समिती प्रमुख<br>२. बेंडाळे उज्वला मोहन - सदस्या<br>३. सोनवणे सुरेश माणिक - सदस्य<br>४. जोहरे प्रिया मधुकर - सदस्या<br>५. कोळी दत्तात्रय देवराम - सदस्य | **५) दवाखाना समिती**<br>१. खडके विश्वनाथ सुरेश, समिती प्रमुख<br>२. सोनवणे अश्विन शांताराम - सदस्य<br>३. चौधरी महेश रतन - सदस्य<br>४. पाटील चंद्रशेखर शिवाजी - सदस्य<br>५. सोनवणे कांचन विकास - सदस्या | **६) नियोजन समिती**<br>१. बालाणी भगतराम रावलमल,समिती प्रमुख<br>२. त्रिपाठी विशाल राधेश्याम - सदस्य<br>३. ढेकळे सदाशिव गणपत - सदस्य<br>४. सोनवणे कैलास नारायण - सदस्य<br>५. सोनवणे मुकुंद भागवत - सदस्य |
| **७) आस्थापना समिती**<br>१. खडके सुनिल वामनराव, समिती प्रमुख<br>२. शेख हसिना बी शरीफ - सदस्या | **८) विधी समिती**<br>१. हाडा शुचिता अतुलसिंह, समिती प्रमुख<br>२. पोकळे दिलीप बबनराव - सदस्य | **९) वाहन व्यवस्था समिती**<br>१. सोनवणे धिरज मुरलीधर, समिती प्रमुख<br>२. पाटील रेखा चुडामण - सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ३. आहुजा मनोज नारायणदास - सदस्य<br>४. पाटील राजेंद्र झिपरु - सदस्य<br>५. चौधरी चेतना किशोर - सदस्या | ३. कोल्हे ललित विजय - सदस्य<br>४. काळे दिपमाला मनोज - सदस्या<br>५. शिंदे गायत्री उत्तम - सदस्या | ३. पाटील प्रतिभा सुधिर - सदस्या<br>४. देशमुख प्रतिभा गजानन - सदस्या<br>५. पाटील मिनाक्षी गोकुळ - सदस्या |

| | |
|---|---|
| **१०) शिक्षण समिती**<br>१. पाटील सचिन भिमराव - समिती प्रमुख<br>२. सपकाळे रंजना भरत - सदस्या<br>३. चव्हाण ज्योती बाळासाहेब - सदस्या<br>४. सोनवणे अंजनाबाई प्रभाकर - सदस्या<br>५. खान रुखसाना बी गबलु - सदस्या | **११) विदयुत समिती**<br>१. राणे गायत्री इंद्रजित - समिती प्रमुख<br>२. कोल्हे प्रविण रामदास - सदस्य<br>३. मराठे राजेंद्र नारायण - सदस्य<br>४. भिल पार्वताबाई दामु - सदस्या<br>५. बारी शोभा दिनकर - सदस्या |

सभागृह नेते यांनी उपरोक्त प्रमाणे शिफारस केलेनुसार समिती निहाय समिती प्रमुखांसह पाच-पाच सदस्यांची त्या त्या विशेष समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

तसेच उपरोक्त ११ समित्यांचे सचिव म्हणुन संबंधित विभागांचे विभाग प्रमुख यांची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. संबंधित विभाग प्रमुख (समिती सचिव) यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार समितींच्या बैठकीचे कामकाज करावे व त्यासंबंधीत सर्व अभिलेखे जतन करुन ठेवावेत.

उपरोक्त सर्व ११ विशेष समित्यांचे समितीप्रमुख यांचेसाठी दालन, वाहन तसेच आवश्यक तो कर्मचारी वर्ग देणेसही मान्यता देण्यात येत आहे. तरी प्रशासनाने समिती प्रमुखांसाठी दालन,वाहन व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दयावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते** :- **६६** **प्रतिकुल मते** :- **००**

**सूचक** :- **बाविस्कर किशोर रमेश**

**अनुमोदक** :- **सोनवणे मुकूंद भागवत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२६ कर्ज विवरण पत्र तयार करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- आपण दिलेल्या कर्ज विवरण पत्राचा प्रस्ताव. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने साधारणता सन २०१९ पर्यंत आपली संपुर्ण कर्ज फेड होणार आहे. मध्यंतरी आपण वृत्तपत्रात वाचले की, आपली काही रक्कम वाचु शकेल अशी चर्चा वत्तपत्रातुन वाचल्या. त्याच्या संदर्भात अंतिम प्रगती काय झाली. काही अचीव होण्यासारखं आहे की फक्त वृत्तपत्रातुन वाचुन समाधान होईल.

मा.आयुक्त :- इस्टीमेटच्या संदर्भात फार कमी चर्चा झालेली आहे की संबंधीतांनी कोणत्या तारखेपासुन किती रक्कम घ्यावी याची मागणी केलेली आहे. हे सर्व काही सुरु आहे.

श्री.नितीन लढढा :- ते म्हणतील डिसेंबर मध्ये की शेवटचा हप्ता भरावा.

मा.आयुक्त :- जेवढी रक्कम आपल्याला भरायची आहे. दर महिन्याला आपण १ कोटी भरतो. तर पाच महिन्याचे पाच कोटी होतील. तर त्यात काही तरी ३७ लाख रुपये कमी होणार.

**श्री.नितीन लढढा:-** माझे मांडण्याचे तात्पर्य एवढेच आहे की संबंधित सदस्य असतील किंवा जळगावाचे नागरीक असतील कुठेतरी एक आशेचे चित्र निर्माण होते परंतु असे काही चित्र प्रत्यक्षात खरे उतरत नाहीत आणि त्यानंतर ती निराशा पदरी पडते म्हणुन ज्या गोष्टी शक्य असतील त्याचे निश्चितच प्रपोगोंडा करा की हे होणार आणि याला आम्ही कायदेशीररीत्या मिळवुन आणु आणि जे होणार नसेल ते स्पष्ट पणे मांडा की असा स्पष्टपणे त्यांना नकार द्या कारण त्यांचे एम.डी जितेंद्रजी देशमुख यांच्याशी सुध्दा मी चर्चा करून घेतली आहे आणि ईनिशियलच्या संदर्भातही चर्चा केलेली होती परंतु त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे नकार दिला होता की लिकींग शेअर ची व्हल्युएशन आज ही बँक तोटयात चाललेली आहे जो पर्यंत ती नफयात येणार नाही तो पर्यंत त्या शेअरची व्हल्यु शुन्य आहे आणि अशाप्रकारे आपले जे शेअर आहेत ते समायोजित करून घेण्याच्या संदर्भातही त्यांनी चर्चा केली होती आणि ती वस्तुस्थिती आहे तर अशीच जर वस्तुस्थिती असेल उगाच त्यामुळे काय होते की आशेचे चित्र निर्माण करायचे आणि मग शेवटी हेच उत्तर येणार की तुम्हाला की डिसेंबर महिन्यातला एक हप्ता भरला आणि जळगांव शहर महानगरपालिका एका कर्ज प्रकरणातुन कर्ज मुक्त झाली हीच बाब तुमची शेवटी येणार .

**मा.आयुक्त :-** मी आता जे उत्तर दिले की जे आम्ही फीजीकली पाहतोय ते जर झाले तर होईल **.**

**श्री.नितीन लढढा:-** आयुक्त साहेब कसे आहे बघा जर कधी बँकेने ठिक आहे तुम्ही तुमची व्यवस्था करा फीजीकली हा नंतरचा विषय येणार आहे .

**मा.आयुक्त :-** नाही तीच वस्तुस्थिती चालु आहे . ठिक आहे पण ते तसे होत नाही त्यामध्ये आपण क्लरीकल बांधील आहोत त्यामध्ये आपण आणि ते रक्कम कॅल्कुलेट करत आहेत आणि ती रक्कम दरमहा भरल्यानंतर अशी जी रचना असेल ती काही प्रमाणात कमी होईल .

**श्री.नितीन लढढा:-** त्या दृष्टीकोनातुन त्याचा कमीत कमी फायदा उचलण्याकरीता प्रशासनाने व्यवस्था करणे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२६ अन्वये प्रत्येक वर्षाच्या शेवटी महानगरपालिका ज्याबद्दल दायी आहे व ज्याची वर्ष सुरु होण्यापुर्वी परतफेड करण्यात आली नाही अशी मागील वर्षात काढलेली कर्जे, वर्षाच्या सुरुवातीस देणे असलेली बाकी रक्कम, कर्ज घेतल्याची तारीख, कर्जा बद्दल द्यावयाचा वार्षिक आकार, त्यावर्षात फेडलेली कर्जे, आणि वर्षा अखेरीस देणे असलेली बाकी रक्कम असे विवरणपत्र महानगरपालिकेच्या महासभेपुढे ठेवण्यात आले पाहिजे व ते शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले पाहीजे या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२६ अन्वये प्रशासनाकडुन सादर झालेल्या सोबतचे परिशिष्ठातील विवरणपत्रास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त मान्यतेनुसार प्रशासनाने सदर विवरणपत्र राजपत्रात प्रसिध्द करण्याची व विवरणपत्राची प्रत्येकी एक प्रत शासन तसेच महालेखापाल, मुंबई यांचेकडेस पाठविण्याची दक्षता घ्यावी.

**सोबत :- परिशिष्ट (**कर्ज विवरण पत्र **) जोडलेले आहे.**

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** विवेकानंद व्यायाम शाळेस जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयामार्फत क्रिडा साहित्य मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अध्यक्ष विवेकानंद व्यायाम शाळा,जळगांव यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडुन व्यायाम शाळा विकास अनुदान व क्रिडागंण विकास अनुदान अंतर्गत अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रिडा धोरण २०१२ व्यायाम शाळा विकास अनुदान योजनेत सुधारीत नियमावली महाराष्ट्र शासन शालेय क्रिडा शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडाधो-संकीर्ण/प्र.क्र.४९/क्रीयुसे-१ दि.०८/०१/२०१९ अन्वये जिल्हा क्रिडा अधिकारी मार्फत साहित्य खरेदीसाठी अनुदान देण्यात येत आहे.

सदर संस्थेला महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडुन ७/१२ वर संस्थेचे नाव नसल्याने तांत्रिक बाबींचे कारण सांगुन अनुदान दिले जात नसल्याने विवेकानंद व्यायाम शाळा, जळगांव यांना जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयामार्फत क्रिडा (व्यायाम) साहित्य तसेच अनुदान मिळणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १६)** क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयामार्फत क्रिडा साहित्य मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. विष्णू भंगाळे :-** अध्यक्ष महोदय हा जो विषय आहे त्यामध्ये सदर व्यायाम शाळेला व्यायामाचे साहीत्य असे वर्णन करून त्याची नोंद घेण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अध्यक्ष क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब, यांनी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडुन व्यायाम शाळा विकास अनुदान व क्रिडागंण विकास अनुदान अंतर्गत अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रिडा धोरण २०१२ व्यायाम शाळा विकास अनुदान योजनेत सुधारीत नियमावली महाराष्ट्र शासन शालेय क्रिडा शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.क्रीडाधो-संकीर्ण/प्र.क्र.४९/क्रीयुसे-१ दि.०८/०१/२०१९ अन्वये जिल्हा क्रिडा अधिकारी मार्फत साहित्य खरेदीसाठी अनुदान देण्यात येत आहे.

सदर संस्थेला महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडुन ७/१२ वर संस्थेचे नाव नसल्याने तांत्रिक बाबींचे कारण सांगुन अनुदान दिले जात नसल्याने क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब, जळगांव यांना जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयामार्फत क्रिडा (व्यायाम) साहित्य तसेच अनुदान मिळणेकामी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बालाणी भगतराम रावलमल**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १७)** पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणेकामी प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा:-** ही जी भरती करणार आहोत त्या शिक्षकांच्या पगाराचा खर्च महानगरपालिका करणार आहे की राज्य शासन करणार आहे ?

**श्री.सचिन पाटील :-** हा प्रस्ताव अपुर्ण आहे त्याची आधी तरतूद करावी मग हा विषय मांडावा .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करणेकामी प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ यांचेकडून आलेला प्रस्ताव मोघम व अपूर्ण स्थितीत आहे. तरी सदरचा प्रस्ताव संपूर्ण माहीतीसह परिपूर्ण तयार करुन महासभेपुढे सादर करावा तोपर्यत सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील सचिन भिमराव**

**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं:- १)** मंजुर विकास योजना जळगाव (वाढीव हद्द) मेहरुण शिवार सेक्टर क्र. ६ मध्ये लो-राईज लो-डेन्सीटी ऐवजी शहराची मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार चटई निर्देशांक १.१ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**श्री.भगतराम बालाणी :-** महापौरताई सेक्टर क्र.६ ला लागुन एक ३० मिटर रुंदीचा रस्ता आहे. आणि किती दिवसापासुन त्याच काम झालेल नाही. तो रस्ता शिरसोली रोड आणि औरंगाबाद रोडला जोडणारा रस्ता आहे. जनतेचे अनेक वाहन त्या रस्त्याने जातील. या पुर्वी महासभेत ठराव झालेला होता. या रस्त्यात जे क्षेत्र बाधीत झाली आहे. कलम ३७ मध्ये आपण ठराव केलेला आहे. त्याला टि.डी.आर. देण्यात यावा परंतु आज एक वर्ष झाल याच्यावर कुठलीही हरकत घेण्यात आली नाही याचे कारण काय ? मला एक सांगा साहेब कलम ३७ चा निर्णय झाला होता.कलम ३७ ला परत पाठवता येत नाही का ? किंवा पाठवायचे नाही असा नियम आहे का ?

श्री.धामणे :- दोन हायकोर्ट मॅटर चालु आहे. आणि न्यायप्रविष्ठ आहे.

मा.आयुक्त :- ठिक आहे.

श्री.नितीन लढढा :- ज्या वेळेला ६ वा झोन मंजुर करण्यात आला होता. त्यावेळेला हा ३० मिटरचा टि.पी. रोड जसा भगतभाई म्हणत आहे.शिरसोली रोड पासुन ते औरंगाबाद रोड पर्यंत. म्हणजे शहराला एक मुख्य कनेक्टीव्हिटी त्याच्यातुन निर्माण होऊ शकते. त्याला राज्य शासनाने मान्यता देतांना एक अट टाकलेली होती. की सर्व बाधीत ३० मिटर रस्ता ज्या जमिनीतुन जाईल. त्या जमिनीचा ज्यावेळेला जमिन मालक विकास करेल त्यावेळेला रस्त्याखालील क्षेत्र हे महानगरपालिकेला त्याने मोफत हस्तांतरण करायचे आहे. जगामध्ये असा कुठलाच कायदा नाही की, तुम्हाला ही वस्तु मला मोफतच द्यावी लागेल. परंतु परवानगी देतांना राज्य शासनाने ती अट टाकलेली होती. आणि त्या अटीच्या अनुषंगाने ज्या जमिनीतुन ते ३० मिटर रस्त्याच क्षेत्र जात असेल आणि एखाद्याची १० एकरची जमिन असेल आणि तो ले आऊट टाकत असेल आणि त्यात आर्धा किंवा पाव एकर त्या रस्त्याखाली जात असेल त्यावेळेला कदाचित तो विचार ही करेल की मी देऊ शकतो.माझ्या जमिनीला लागुन रस्त्याचा विकास होत आहे. परंतु काही क्षेत्र त्याच्या मध्ये इतके छोटे आहे. आर्ध्या एकरच्या क्षेत्राचा मालक आहे एक एकरच्या क्षेत्राचा मालक आहे. आणि त्यानी जर महापालिकेला मोफत देण्याचा प्रयत्न केला तर ९०% जागा त्याला महापालिकेला मोफत हस्तांतरण करावी लागेल. मग अश्या परिस्थिती मध्ये तो जमिन मालक आपल्या जमिनीचा कधीही विकास करणार नाही. अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. धामणे साहेब जे म्हणत आहे ते ही बरोबर आहे. या संदर्भात कोर्टात रिट पिटीशन दाखल झालेलं आहे. रिट पिटीशनचा संपुर्ण Arguement संपलेले आहे. जजमेंट द्यायचे बाकी आहे. त्याला जवळपास ६ महिन्याचा कालावधी झाला. या गोष्टीसाठी कुठेतरी म.न.पा.च्या वकीलाने ही गोष्ट उच्च न्यायालयात निदर्शनास आणुन द्यायला पाहिजे कि अशी पिटीशन मध्ये Arguement Close होऊन त्याचा Decision घेणे बाकी आहे. त्यामुळे आमची सर्व प्रक्रिया थांबलेली आहे. दुसरं भगतभाईंनी जे म्हटले की उच्च न्यायालयाने कुठलाही स्थगीती आदेश दिलेला नसल्या कारणाने कलम ३७ ची जी प्रक्रिया आहे ती ही प्रशासनाने तातडीने सुरु करावी. ही सभागृहाला विनंती आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव-भुसावळ प्रादेशिक योजना शासनाच्या नगरविकास विभागाने दि. 12/11/1991 च्या निर्णयान्वये मंजुर केलेली आहे. मेहरुण शिवारातील सेक्टर 6 चा भाग जळगाव नगरपरिषद हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर वाढीव हद्दीची विकास योजना जळगाव नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमचे कलम 26 अन्वये दिनांक 02/11/1995 रोजी प्रसिध्द केली होती. तद्नंतर तत्कालीन नगरपरिषदेने वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 30 अन्वये शासनास सादर करतांना मेहरुण तलावालगतच्या सेक्टर क्र. 6 व 7 च्या जमिनी रहिवास विभागात समाविष्ट करुन त्यातील विकास लो-राईज लो-डेन्सीटी या तत्वावर करण्याची शिफारस शासनास केली होती.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमचे कलम 31 (1) अन्वये वाढीव हद्दीची विकास योजना शासनाने पुर्नप्रसिध्द केली. या पुर्नप्रसिध्द योजनेच्या ई.पी.66 नुसार शासनाने केवळ सेक्टर 6 मधील जमीन लो-राईज लो-डेन्सीटी तत्वावर विकसीत करणेबाबत निर्णय घेतला व त्यावर सुचना हरकती मागविण्यात आल्या. त्यावेळी स्थानिक नागरिकांनी ई.पी.क्र. 66 बाबत हरकत अर्ज सादर केला होता, त्यात त्यांनी चटई निर्देशांक 0.50 ऐवजी शहरात लागू असलेला चटई निर्देशांक निर्धारीत करण्याची मागणी शासनाकडे केली होती. तथापी त्यावेळी शासनाने जळगाव नगरपरिषदेने सुचविलेल्या बदलाप्रमाणे लो-राईज लो-डेन्सीटी अनुज्ञेय करुन ई.पी.क्र.66 ला मान्यता देऊन सेक्टर 6 मध्ये लो-राईज लो-डेन्सीटीसह 0.50 चटई निर्देशांक दिनांक 10/08/2004 च्या शासन निर्णयानुसार मान्य झालेला आहे.

मेहरुण तलावाच्या पूर्व-पश्चिम व उत्तर बाजू लगतच्या रहिवास विभागातील जमिनींना प्रचलीत असलेले विकास नियंत्रण नियमावलीतले रहिवास विभागाचे सर्वसाधारण नियम लागू असल्याने या जमिनींवर आज 7 ते 8 माळयाच्या भव्य इमारती उभारलेल्या आहेत व संपूर्ण परिसर विकसित झालेला आहे. या जमिनींच्या पूर्वेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत विकसीत झालेली असून त्यामुळे या परिसरामध्ये किफायतशीर घरांची मागणी वाढत आहे व सद्यस्थितीमध्ये

या परिसरात सेक्टर 6 मधील जमीनीच विकासासाठी उपलब्ध आहे. मात्र किफायतशीर घरांचा पुरवठा वाढविणेसाठी सेक्टर 6 साठी लावण्यात आलेल्या नियमांचे बंधनामुळे सन 2004 पासून जवळपास 15 वर्षांच्या कालावधीत तेथे एकही चौरस फूट जागा विकसित झालेली नाही. सदर नियम शिथील केल्याने रहिवास विभागातील जमीनी विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार पूर्ण क्षमतेने विकासासाठी उपलब्ध होवून जमिनींच्या व पर्यायाने घरांच्या किंमतीत लक्षणीय घट होईल.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून नियोजन प्राधिकरण म्हणून सेक्टर 6 मध्ये शहराच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीतील सर्व तरतुदी लागू करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37 अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे उचित होईल असे महासभेचे मत आहे. वरीलप्रमाणे बदल झाल्यास सेक्टर 6 मध्ये विकासासोबतच तेथील वाढीव लोकसंख्येसाठी पाण्याची व ई.पी.क्र. 66 प्रमाणे केवळ ड्रेनेजची नियमावली व त्याचे नियोजन लक्षात घेण्यात येईल. सदर परिसरातील वाढीव लोकसंख्येसाठी मुलभूत सेवा सुविधा महापालिकेतर्फे उपलब्ध करण्यात येतील. सबब सदर सेक्टर 6 मध्ये रहिवास विभागासाठी ई.पी.क्र. 66 नुसार विकास योजना (वाढीव हद्द) मंजूर केलेल्या विशेष बांधकाम विकास नियम रद्द करुन शहराच्या विकास योजनेतील इतर रहिवास विभागासाठी लागू असलेली बांधकाम विकास नियमावली अंमलात येतील असा बदल करण्याचा कलम 37 च्या प्रस्तावाला मंजूरी देत आहे.

सदर फेरबदलाची सूचना शासन राजपत्रामध्ये व स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यास तसेच या प्रस्तावावर नागरिकांकडून ज्या काही सुचना/हरकती येतील त्यांना सुनावणी देऊन शासनास मंजुरीसाठी अंतीमरित्या प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार ही सभा आयुक्तांना देत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | - | **६६** | **प्रतिकुल मते** | - | **००** |
| **सूचक** | - | **बालाणी भगतराम रावलमल** | | | |
| **अनुमोदक** | - | **पाटील राजेंद्र झिपरु** | | | |

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- १)** काव्य रत्नावली चौक ते रामानंद नगर घाटापर्यंतच्या प्रमुख रस्त्याला (पथ) राष्ट्रसेविका समिती आदयप्रमुख संचालिका वंदनिय लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर पथ (मार्ग) असे नामकरण करणेबाबत सौ.संगीता दिपक अट्रावलकर, शहर कार्यवाहीका, राष्ट्रसेविका समिती,जळगांव यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राष्ट्रसेविका समिती तर्फे जळगांव शहरातील नागरीकांसाठी सामाजिक, सांस्कृतिक तसेच इतर कार्यक्रम राबविण्यात येत असतात. राष्ट्र सेविका समितीने दिलेल्या अर्जानुसार काव्य रत्नावली चौक ते रामानंद नगर घाटापर्यंतच्या प्रमुख रस्त्याला (पथ) राष्ट्रसेविका समिती आद्य प्रमुख संचालिका वंदनिय “लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर पथ (मार्ग)” असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे मात्र सदर रस्त्यास/मार्गास यापूर्वी नांव दिले आहे किंवा कसे याबाबत प्रशासनाने खात्री करुन घ्यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश / निर्देशानुसार नियमाप्रमाणे आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर

| | | | |
|---|---|---|---|
| अनुकूल मते | :- ६६ | प्रतिकुल मते :- ०० | |
| सूचक | :- बेंडाळे उज्वला मोहन | | |
| अनुमोदक | :- राणे गायत्री इंदजित | | |

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- २)** स्मशानभुमीसाठी जागा मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.पार्वताबाई दामु भिल यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, हरिविठ्ठल नगर, पिंप्राळा हुडको, वाघ नगर, येथे मोठया प्रमाणात भिल्ल आदिवासी समाज वास्तव्य करीत आहे. सदर भागात एक एक वस्तीत ५०० ते १००० लोकसंख्या आहे व दरवर्षाला जवळ जवळ ३ ते ४ व्यक्ती मरण पावतात परंतू सदर भागामध्ये प्रेत दफन करण्यासाठी कुठलीही दफनभुमी नसल्या कारणाने नागरीकांना प्रेत दफन करण्यासाठी अडचण निर्माण होत असल्याने सन्मा.सदस्य यांनी मागणी केल्याप्रमाणे पिंप्राळा गट क्र. व उपविभाग २६० मधिल जागा भिल्ल आदिवासी समाजा करिता दफनभुमीसाठी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- भिल पार्वताबाई दामु**
**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ३)** महानगरपालिका संचलित चौबे शाळेच्या प्रांगणातील शहीद भगतसिंग व्यायाम शाळा देखभालीसाठी उपलब्ध करुन मिळणेबाबत अध्यक्ष,शनिपेठ मित्र मंडळ,जळगांव यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील शनिपेठ स्थित जळगांव शहर महानगरपालिका संचलित स्व.रामलालजी चौबे शाळेत शनिपेठ मित्र मंडळाला कार्यालय उपलब्ध करुन देण्यात आले असुन त्याव्दारे मंडळाचे विविध उपक्रम, कामकाज सुरु आहे. सदर शाळेच्या प्रांगणात स्थित असलेली शहीद भगतसिंग व्यायाम शाळा कार्यरत असुन तेथे बरेच खेळाडू व्यायाम करीत असतात मात्र सदर व्यायाम शाळेची प्रशासन किंवा इतर कोणाही संस्थेस देखभाल दिली नसल्यामुळे व्यायाम साहित्याची नासधूस, साहित्य चोरी होणे, व्यायामपटूनां मार्गदर्शन व शिस्त लावनेचा अभाव अश्या अडचणी निर्माण होत आहे. करिता मनपा संचलित चौबे शाळेतील शहीद भगतसिंग व्यायाम शाळा ही शनिपेठ मित्र मंडळ,जळगांव यांना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र सदर व्यायाम शाळा यापुर्वी इतर संस्थेस/मंडळास दिली गेली नसल्याची खात्री प्रशासनाने करुन घ्यावी.

सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सनकत चेतन गणेश**
**अनुमोदक :- मराठे जितेंद्र भगवानराव**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ४)** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा पसिर चौकास त्यांचे नांवाने नामकरण करणेबाबत मा.महापौर,सौ.सिमा सुरेश भोळे तसेच सन्मा.सदस्या सौ.मंगला संजय चौधरी यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

श्री.विष्णु भंगाळे :- माझी एक सुचना आहे की अजंठा चौफुलीला जे गणपती विकणारे बसतात. त्यांना दोन्ही साईटच्या ऐवजी एकच साईटची परवानगी द्यावी. जेणे करुन रस्त्यातील नियोजन होईल अशी एम.आय.डी.सी.मधील काही उद्योजकांची मागणी आहे.

श्री.इब्राहिम पटेल :- आयुक्त साहेब माझ्या वार्डात जी ३६/५६ नंबर शाळा आहे. त्यात विद्यार्थी संख्या ३ पटीने जास्त आहे. पुर्ण जळगांव शहरात जास्तीची पटसंख्या आहे. विद्यार्थी तेथे खाली बसतात पोर्च मध्ये. म्हणजे शाळा कमी पडते.

कमीत कमी ९०० च्यावर तेथे पटसंख्या आहे. त्याच्या बाजुला आपली एक शाळा आहे. ती बंद होण्याच्या अवस्थेत आहे. ते देण्यास ही तयार आहे. त्यांना जर पर्यायी जागा दिली तर बरं होईल.
श्री.नवनाथ दारकुंडे :- मी मागच्या महासभेमध्ये ही बोललो आणि स्थायी सभेमध्ये ही विषय ठेवलं. दवाखान्याच काय झाले.
श्री.चेतन सनकत :- मागच्या महासभेत आपण ठराव केले होते ठराव क्र.१५७ बडतर्फ कर्मचारी श्री.गोपी राजु हंसकर त्यांचा प्रस्ताव आला होता. ते पुढच्या महासभेत ठेवणार होता परंतु आला नाही विषय.
मा.आयुक्त :- प्रकरणाचा अभ्यास चालु आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा ज्या चौकात स्थित आहे त्या चौकास "साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे" असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर चौकास यापुर्वी कोणतेही नांव दिले गेले नसल्याची खात्री प्रशासनाने करुन घ्यावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- चौधरी मंगला संजय**
**अनुमोदक :- सोनवणे धिरज मुरलीधर**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ५)** दिनांक २१/०२/२०१९ रोजी झालेल्या महासभा विषय क्रं.२८ ठराव क्र.१०५ मध्ये दुरुस्ती करणेबाबत सन्मा.सदस्या सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिनांक २१/०२/२०१९ रोजी झालेल्या महासभेतील विषय क्रं.२८ ठराव क्र.१०५ मध्ये नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजुर झालेल्या मुलींसाठी अभ्यासिका बांधणे कामी श्रध्दा कॉलनी स.नं.४७१/अ.१/२अ असा चुकीचा सर्व्हे नंबर चा ठराव झालेला असुन त्याऐवजी स.नं.४७१/अ१/२क/१+४७१/अ२/२ब मेहरुण असा सर्वे नंबर दुरुस्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**
**अनुमोदक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ६)** शाळेच्या प्लॉटला लागून असलेली खुली जागा (Open Space) मिळणेबाबत मो.इब्राहीम उस्मान पिंजारी अध्यक्ष, अलमन्सुर एज्युकेशन & वेल्फेअर सोसायटी, ९२ जोशीपेठ जळगांव यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अलमन्सुर एज्युकेशन & वेल्फेअर सोसायटी मार्फत चालणारी अलहक प्राथमिक उर्दू शाळा खंडेराव नगर,जळगांव मागील १८ वर्षापासून या गरीब वस्तीत सुरु आहे. खंडेराव नगर, आझाद नगर हुडको येथे मोलमजुरी करणाऱ्या समाजाची दाट वस्ती असून याठिकाणी एका शाळेची अत्यंत गरज होती. ती गरज अलहक अर्दू प्राथमिक शाळा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या भागात महानगरपालिकेची प्राथमिक उर्दू शाळा नाही. मागील वर्षी

संस्थेमार्फत एक प्लॉट गट नं.२११, प्लॉट नं.२९ खरेदी करण्यात आला आहे. तरी त्या प्लॉटला लागून असलेली गट क्रं. व उपविभाग २११/मोकळी/जागा अलमन्सुर एज्युकेशन & वेल्फेअर सोसायटी, ९२ जोशीपेठ जळगांव यांना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- महाजन सुनिल सुपडू**
**अनुमोदक :- शेख शबानाबी सादीक**

**नगरसचिव :- आयत्यावेळेचा विषय क्रं:- ७)** कॉलनीचे नाव बदल करुन मिळणेबाबत सन्मा.सदस्या सौ.शोभाताई दिनकर बारी तसेच श्री.उदय जानकीराम बेंडाळे व इतर रहिवाशी वार्ड क्रं.१० यांचेकडून आलेल्या पत्राचे वाचन करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.उदय जानकीराम बेंडाळे व इतर रहिवासी यांनी कॉलनीचे नांव बदल करण्याचा प्रस्ताव सन्मा.सदस्या सौ.शोभा दिनकर बारी यांचे कडेस दिलेला असुन बीबा नगर -३ पिंप्राळा शिवार पोदार शाळेमागे जळगांव ता.जि.जळगांव असे कॉलनीचे नाव दिलेले असुन सदर नाव बदलवुन त्याऐवजी शिवराय कॉलनी, पिंप्राळा शिवार, पोदार शाळे मागे, जळगांव. ता.जि.जळगांव या प्रमाणे कॉलनीचे नाव बदल करण्यात यावे असे अर्जात नमूद केलेले आहे.

करिता सदया निवासी असलेल्या नागरीकांनी दिलेल्या अर्जावरुन सदर कॉलनीचे नाव बीबानगर - ३ ऐवजी **" शिवराय कॉलनी "** नांव देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- बारी शोभा दिनकर**
**अनुमोदक :- पाटील कुलभूषण विरभान**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**(सिमा सुरेश भोळे)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**